SONI Since 1965
TILES
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road,
Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of -
Ceramic Wall & Floor Tiles,
Vitrified Tiles, Paving Blocks,
Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज



नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ०२.११.२०२६ | अंक नं. १८१ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी
। थर्मल । स्वेटर्स । जर्किन
। ग्लोज । सॉक्स । स्कार्फ
। कॅप्स् एकाच ठिकाणी
आता पुण्यात सुद्धा..

जरीवाला
कापड बाजार, अ.नगर.
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, विमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



₹11 लाखांची
1111 बक्षिसे
जिंकण्याची संधी...
विश्वसनीय कापडांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर 02425-222226 | अ.नगर 0241-2999299 | नारायणगाव 02132-242132 | श्रीरामपूर 02422-220090 | नाशिक 9920552780


PURE EV
अहिल्यानगर व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी डीलरशिप देणे आहे
GO.. PURE GO.. GREEN
तुमची आवडती ई ही बाईक खरेदी करा आणि मिळवा आकर्षक बक्षीस

गाडीच्या EX शोरूम प्राईजवर 5% ते 8% पर्यंत डिस्काउंट
प्रत्येक गाडी खरेदीवर एक हमखास गिफ्ट कुपन

इलेक्ट्रिक वाहनांचे नवे युग यासाठी आजचं भेट द्या
श्री. सिमरन सुभाष विखोना 9767119099 / 7387419999
सौ. प्रिती सिमरन विखोना 8668854061 / 7389389393
पत्ता - साई श्याम पि.वि. गांधी विकास फर्निचर शेजारी नेवासा- नेवासा फाटा रोड

Viraasat HEMRAJ CATERERS
हेमराज
दिवाळी फराळ
सथ्था कॉलनी, कोठी रोड, अहिल्यानगर. (MH)
9921599216 | 9890298899

लक्ष्मण एजन्सीज 9890963100
चोखंदळ विक्रेत्यांसाठी व ग्राहकांसाठी
आहेर घर
१८+१८+१८=५४ प्रकार
दिवाळी कार्तीक मास लग्नसराई, गिफ्ट पॅक अनुभव हिच खात्री
एक वेळ अवश्य भेट द्या
लक्ष्मी मार्केटिंग 9760045549

यंदाची सुवर्णखरेदी, भरघोस फायद्याची..
दिवाळी धमाका ऑफर
₹999/- प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांची) + ₹111/- चांदी चक्क फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)

11 सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी*
(प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)
ऑफर कालावधी – 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु
Conditions Apply*

ROYAL ENFIELD
NEWASKAR
सर्व मॉडेल व सर्व कलर्स उपलब्ध
Festival Dhamaka with ROYAL ENFIELD
PRICE STARTING FROM ₹138998*

फायनान्स* सुविधा उपलब्ध | कमीत कमी* डाऊन पेमेंट | 3000 EMI* प्रती लाख पासून पुढे | कमीत कमी* व्याजदर
NEWASKAR AUTOMOBILES
अहिल्यानगर - केडगाव इंडस्ट्रियल इस्टेट, नगर-पुणे रोड
M. 8446300300 I 8793800900
संगमनेर - पंचायत समिती शेजारी, नगर रोड, संगमनेर M. 8446300400 I 8793223344
कोपरगाव - गोदावरी पेट्रोल पंप शेजारी, जुना येवला रोड M. 9561134534
श्रीगोंदा - छत्रपती कॉलेज जवळ, काष्टी रोड M. 8446500300
नेवासा - छ. संभाजीनगर रोड, नेवासा फाटा M. 8055802801
*T&C Apply

Hero
हिरोसोबत सण आहे सगळीकडे...
Herotsav
1st - 4th Nov, 2026
हिरो जिंकण्याची संधी मिळवा दररोज दुचाकी.



एक्स-शोरूम किंमत ₹77 750* पासून सुरु
मर्यादित कालावधीची ऑफर
कैश डिस्काउंट ₹2 500* पर्यंत | एक्सचेंज बोनस ₹5 000* पर्यंत
वित्तपुरवठा 100%* पर्यंत | एक्सक्लुझिव्ह कॉर्पोरेट ऑफर्स ₹3 200* पर्यंत
त्वरित सवलत ₹10 000* पर्यंत
Destini 125
Hero GoodLife Stand a chance to win Gold Coins and more!! | Also Available on Flipkart amazon.in
TOLL FREE 1800 266 0018
Authorised Dealers:
Ahilyanagar : Ilakshi Hero 9289922398, Saideep Hero 9289922485;

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

गुंतवणुकीचा निर्णय घेताना माहितीचा उपयोग कसा करावा



राजन कुटे

म्युच्युअल फंडात गुंतवणूक करण्याचा विचार करताना आपण अनेकदा काही सोप्या गोष्टी पाहतो. फंडाने किती परतावा दिला आहे, तो किती लोकप्रिय आहे किंवा एखाद्या ओळखीच्या व्यक्तीने त्यात गुंतवणूक केली आहे का? या गोष्टींमुळे एखाद्या फंडाकडे आपलं लक्ष जाऊ शकतं. पण त्याच आधारावर गुंतवणुकीचा निर्णय घेणं योग्य ठरेलच असं नाही.

समजा, आपल्याकडे ₹२ लाख गुंतवण्यासाठी आहेत आणि दोन म्युच्युअल फंड आपल्या विचाराधीन आहेत. पहिल्या फंडाने मागील तीन वर्षांत दुसऱ्या फंडापेक्षा अधिक परतावा दिला आहे. त्यामुळे पहिला फंड अधिक चांगला वाटू शकतो. पण या दोन्ही फंडांची गुंतवणुकीची पद्धत, पोर्टफोलिओची रचना आणि जोखीम सारखी नसेल, तर केवळ परताव्याच्या आधारे त्यांची तुलना करणं पुरेसं ठरेल का?

इथे फंडाबद्दल उपलब्ध असलेली अधिकृत माहिती उपयोगी ठरते. Scheme Information Document (SID), Key Information Memorandum (KIM) आणि Fund Factsheet हे दस्तऐवज केवळ वाचण्यासाठी नसतात; त्यातील माहिती आपल्याला पर्यायांमधील फरक समजून घेण्यास आणि आपल्या परिस्थितीशी सुसंगत निर्णय घेण्यास मदत करू शकते.

उदाहरणार्थ, SID मधून एखाद्या योजनेचं उद्दिष्ट आणि तिची गुंतवणूक रणनीती समजून घेता येते. फंड कोणत्या प्रकारच्या मालमत्तांमध्ये गुंतवणूक करू शकतो, कोणत्या जोखमी स्वीकारतो आणि त्याच्या कामकाजावर कोणत्या अटी लागू होतात, याची माहिती मिळते. या माहितीमुळे फंडाची रचना, त्याची गुंतवणूक पद्धत आणि त्यातील जोखीम समजून घेता येते. त्यामुळे केवळ परतावा पाहण्याऐवजी, हा फंड आपल्या उद्दिष्टांसाठी योग्य आहे का, हे तपासता येतं.

KIM मधून योजनेचे प्रमुख तपशील संक्षिप्त स्वरूपात समजून घेता येतात. एखाद्या मुद्द्याबद्दल अधिक माहिती हवी असल्यास SID पाहता येतो. म्हणजेच, सुरुवातीला सर्व तपशील वाचण्याऐवजी निर्णयासाठी महत्त्वाच्या बाबी ओळखून त्यांचा अधिक सखोल अभ्यास करता येतो.

Fund Factsheet आपल्याला आणखी एक बाजू समजून घेण्यास मदत करते. त्यातून फंडाची ठरावीक कालावधीतील कामगिरी, पोर्टफोलिओची रचना आणि त्यातील प्रमुख गुंतवणुका यांचा आढावा घेता येतो. समजा, एखाद्या फंडाने चांगला परतावा दिला आहे. Factsheet पाहताना त्या काळात फंडाने कोणत्या प्रकारच्या गुंतवणुका केल्या होत्या, त्याच्या पोर्टफोलिओची रचना कशी होती आणि कामगिरी कोणत्या कालावधीची आहे, हे तपासता येतं. त्यामुळे केवळ परताव्याचा आकडा पाहण्याऐवजी त्यामागची परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न करता येतो. मात्र, मागील कामगिरी भविष्यातही तशीच राहील याची हमी नसते.

आता दुसरी परिस्थिती पाहू. समजा, पुढील दोन-तीन वर्षांत आपल्याला घरासाठी मोठी रक्कम लागणार आहे. एखाद्या इक्विटी फंडाने दीर्घकाळात चांगली कामगिरी केली आहे म्हणून त्या पैशासाठी तो योग्य ठरेलच असं नाही. त्या पैशाची गरज कधी पडणार आहे, तोपर्यंत बाजारात घसरण झाली तर काय परिणाम होऊ शकतो आणि आपल्याला किती स्थैर्य आवश्यक आहे, हेही विचारात घ्यावं लागेल. याउलट, दीर्घकालीन उद्दिष्टासाठी गुंतवणूक करताना वेगळे पर्याय आणि वेगळे निकष महत्त्वाचे ठरू शकतात. यातून एक गोष्ट स्पष्ट होते. एखादा फंड चांगला आहे का, हा प्रश्न महत्त्वाचा असला तरी तो पुरेसा नाही. तो आपल्या पैशासाठी योग्य आहे का, हा प्रश्नही विचारावा लागतो. कारण प्रत्येक गुंतवणूकदाराची आर्थिक परिस्थिती, उद्दिष्टं, गुंतवणुकीचा कालावधी आणि जोखीम पेलण्याची क्षमता वेगवेगळी असते.

या दस्तऐवजांमधील प्रत्येक तांत्रिक तपशील प्रत्येक गुंतवणूकदाराला स्वतःच समजला पाहिजे, असं नाही. पण कोणती माहिती निर्णयावर परिणाम करू शकते, काय समजलं आहे आणि कोणत्या बाबींबद्दल अधिक स्पष्टीकरण आवश्यक आहे, हे ओळखता येणं महत्त्वाचं आहे. जे समजत नाही ते विचारणं आणि आवश्यक ते मार्गदर्शन घेणं हाही माहितीचा योग्य उपयोग करण्याचाच भाग आहे.

SID, KIM आणि Fund Factsheet आपल्यासाठी गुंतवणुकीचा निर्णय घेत नाहीत. मात्र, ते पर्यायांमधील फरक समजून घेण्यासाठी, फंडाची रचना आणि जोखीम तपासण्यासाठी आणि आपल्या परिस्थितीशी सुसंगत निर्णय घेण्यास मदत करू शकतात. गुंतवणुकीत माहिती मिळवणं ही सुरुवात आहे. त्या माहितीच्या आधारे कोणता पर्याय आपल्या उद्दिष्टांसाठी योग्य ठरू शकतो, कोणती जोखीम स्वीकारावी लागू शकते आणि कोणत्या बाबींची अधिक खात्री करून घ्यावी, हे समजून घेणं अधिक महत्त्वाचं आहे. माहितीचा खरा उपयोग केवळ अधिक जाणून घेण्यात नाही, तर आपल्या निर्णयामागचं कारण अधिक स्पष्ट होण्यात आहे. स्पष्ट ठेवा, शांत ठेवा.

- राजन कुटे, अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०





अहिल्यानगर जिल्हा न्यायालयाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याने पोलीस, वकील व नागरिकांची धावपळ उडाली.

अहिल्यानगर जिल्हा न्यायालय बॉम्बने उडवून देण्याच्या धमकी

नगर - अहिल्यानगरसह राज्यातील एकाच वेळी पाचहून अधिक जिल्हा न्यायालयांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याने एकच खळबळ उडाली आहे. या धमकीनंतर पोलिसांची एकच धावाधाव झाली. दुपारी तीनच्या दरम्यान एका अज्ञात व्यक्तीने ई-मेलच्या माध्यमातून धमकी दिल्याची माहिती मिळत आहे. त्यानंतर पोलिसांनी जिल्हा न्यायालय परिसर रिकामा केला. आता न्यायालयाला कोणी धमकी दिली, याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे. पोलिसांनी न्यायालयाच्या ठिकाणी मोठा बंदोबस्त तैनात केला आहे. या घटने मुळे वकील व नागरिकांचा एकच गोंधळ उडाला होता.

अहिल्यानगर जिल्हा न्यायालयाची इमारत बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा ई-मेल अज्ञात व्यक्तीद्वारे मिळाली. या गंभीर प्रकारानंतर खबरदारीचा उपाय म्हणून सर्व न्यायाधीश, वकील आणि कर्मचाऱ्यांना बाहेर काढून न्यायालयाची इमारत तातडीने रिकामी करण्यात आली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि बॉम्ब शोधक व नाशक पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. संपूर्ण न्यायालय परिसराची कसून तपासणी करण्यात आली. सायबर पोलीस या धमकीच्या ई-मेलचा शोध घेत आहेत. अहिल्यानगरबरोबरच सातारा, ठाणे, सोलापूर, हिंगोली येथील न्यायालयेही बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. दरम्यान, हा धमकीचा प्रकार खोडसाळपणाचा असल्याची चर्चा न्यायालयाच्या आवारात सुरु होती.

अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व सेतू केंद्रांना जिओ-लोकेशन बंधनकारक करण्यात यावे

अधिकृत सेतू चालकांनी केली जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

नगर - जिल्ह्यातील काही सेतू केंद्र चालक आपले अधिकृत लॉगिन आयडी व पासवर्ड सायबर कॅफे चालकांना किंवा अन्य व्यक्तींना भाडेतत्त्वावर वापरण्यास देत असल्याच्या तक्रारींची चौकशी करून अशा प्रकारांना आळा घालावा, अशी मागणी अधिकृत सेतू केंद्र चालकांकडून करण्यात येत आहे. जिल्ह्यातील सर्व सेतू केंद्रांना जिओ-लोकेशन बंधनकारक करून मंजूर ठिकाणापासून केवळ एक किलोमीटरच्या परिसरातच कामकाज करण्याची व्यवस्था लागू करावी, अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

शासनाच्या विविध योजनांचे दाखले, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, जात प्रमाणपत्र तसेच इतर ऑनलाइन शासकीय सेवांसाठी नागरिक अधिकृत सेतू केंद्रांवर अवलंबून असतात. सेतू केंद्र सुरू करण्यासाठी संबंधित चालकांना कार्यालय, संगणक, इंटरनेट, वीज, कर्मचारी आणि इतर सुविधांवर खर्च करावा लागतो. मात्र, काही ठिकाणी अधिकृत सेतू केंद्राच्या नावाखाली इतर ठिकाणांहून अर्ज भरण्याचे काम होत असल्यास, नियमांचे पालन करून व्यवसाय करणाऱ्या अधिकृत सेतू चालकांवर अन्याय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

वीस ते पंचवीस किलोमीटरची पायपीट का?

राहता तालुक्यातील साकुरी येथील एखाद्या नागरिकाला दाखला काढायचा असल्यास तो साकुरी किंवा राहता येथील जवळच्या अधिकृत सेतू केंद्रात जाणे स्वाभाविक आहे. मग संबंधित नागरिकाला साकुरी-राहता परिसर सोडून २० ते २५ किलोमीटर जाऊन दाखला काढण्याची वेळ का यावी, असा सवाल उपस्थित केला जात आहे. मंजूर केंद्राबाहेरून दुसऱ्या ठिकाणी शासकीय ऑनलाइन सेवा दिल्या जात असल्यास त्याची पडताळणी होणे आवश्यक असल्याचे सेतू चालकांचे म्हणणे आहे.

लॉगिन आयडीच्या वापरावर नियंत्रणाची गरज

सेतू केंद्रांचे लॉगिन आयडी आणि पासवर्ड इतर व्यक्तींना वापरण्यास दिले जात असल्याच्या तक्रारींची प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी. अशा प्रकारांमुळे शासकीय ऑनलाइन प्रणालीच्या सुरक्षिततेचा, अर्जदारांच्या वैयक्तिक कागदपत्रांच्या गोपनीयतेचा आणि संबंधित व्यवहारांच्या जबाबदारीचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व सेतू केंद्रांची प्रत्यक्ष तपासणी करून मंजूर पत्ता आणि प्रत्यक्ष कामकाजाचे ठिकाण यांची पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

जिओ-लोकेशनद्वारे कामकाजावर नियंत्रण ठेवा

जिल्ह्यातील सर्व अधिकृत सेतू केंद्रांना जिओ-लोकेशन प्रणालीशी जोडण्यात यावे. संबंधित पोर्टलवर लॉगिन करताना नोंदणीकृत केंद्राचे लोकेशन पडताळण्याची तांत्रिक सुविधा उपलब्ध करून द्यावी. मंजूर ठिकाणापासून एक किलोमीटरच्या परिसरातच सेतू सेवा चालविण्याबाबत सक्षम प्राधिकरणाने नियम निश्चित करावेत. तसेच अनधिकृत ठिकाणांहून कामकाज होत असल्याचे आढळल्यास संबंधित नियमांनुसार कारवाई करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

अधिकृत सेतू चालकांच्या व्यवसायाचे संरक्षण करा

शासकीय नियमांचे पालन करून अधिकृत केंद्र चालविणाऱ्या सेतू चालकांना समान संधी मिळावी, त्यांच्या व्यवसायावर अनधिकृत कामकाजाचा परिणाम होऊ नये आणि नागरिकांना सुरक्षित व पारदर्शक सेवा मिळाव्यात, यासाठी जिल्हा प्रशासनाने स्पष्ट नियमावली तयार करावी. तसेच सेतू चालकांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून नियमित तपासणी अभियान राबवावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.



जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी नगर येथील भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये मतदान पार पडले. यावेळी उमेदवार संगीता वाघ, प्रशांत लोखंडे, हर्षदा काकडे यांच्यासह माजी खासदार सुजय विखे, आमदार संग्राम जगताप, आमदार अक्षय कर्डिले एकत्रित हास्यविनोद करताना.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी चुरशीने मतदान

नगर- अशिया खंडात अग्रगण्य असणाऱ्या जिल्हा सहकारी बँकेच्या २१ पैकी १० जागांसाठी चुरशीने मतदान पार पडले. जिल्ह्यातील १४ तालुक्यांसह नगर शहर असे ३३ ठिकाणी मतदान झाले. ११ जागा यापूर्वीच बिनविरोध झालेल्या असून या अकराही जागांवर विखे-थोरात-गडाख गटाचे वर्चस्व राहिलेले आहे. बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी जिल्ह्यातील दिग्गज नेत्यांनी केलेले प्रयत्न अपयशी ठरल्याने दहा जागांसाठी २७ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. खासदार, आमदार, माजी आमदारांसह राजकीय नेत्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले असून या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. ३ नोव्हेंबर रोजी लगेच मतमोजणी होणार आहे.

जिल्ह्यात एकूण ३ हजार ८३७ मतदार असून सकाळी आठ ते दहा या वेळात त्यातील ६५५ मतदारांनी मतदान केले होते. तर, दुपारी बारा वाजता दोन तासात हा आकडा २ हजार २०३ एवढा झाला होता. म्हणजे ही आकडेवारी ५७. ४१ टक्क्के एवढी होती.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत अकोले सोसायटी मतदारसंघातून विद्यमान आ. डॉ. किरण लहामटे, राहुरी सोसायटी मतदारसंघातून माजी मंत्री तथा विद्यमान आ. प्राजक्त तनपुरे, शेतीपूरक व शेतमाल सहकारी संस्था मतदारसंघातून आ. आशुतोष काळे, पारनेर सोसायटी मतदारसंघातून खा. निलेश लंके हे निवडणूक रिंगणात आहेत. त्यांच्यासोबतच अनुसूचित जाती जमाती मतदारसंघातून माजी आ. वैभव पिचड, राहुरीतून माजी आ. चंद्रशेखर कदम यांचे चिरंजीव सत्यजित कदम तर अनुसूचित जमाती मतदारसंघातून माजी खासदार सदाशिव लोखंडे यांचे पुत्र प्रशांत लोखंडे निवडणूक रिंगणात आहेत.

हे संचालक झालेले आहेत बिनविरोध


यापूर्वी जिल्हा बँकेवर आ. मोनिका राजळे, आ. अक्षय कर्डिले, माजी मंत्री शंकरराव गडाख, डॉ. सुजय विखे, बिपिन कोल्हे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष राजश्री घुले, माजी संचालक करण ससाणे, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे जावाई रणजीत देशमुख आणि दत्तात्रय पानसरे यासह सचिन घुमरे बिनविरोध निवडून आलेले आहेत. तसेच बिगर शेती मतदारसंघातून सचिन जगताप हे जिल्हा बँकेत अविरोध निवडून आलेले आहेत.

विद्यापीठ-महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा ५ नोव्हेंबर रोजी मोर्चा

नगर - महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी संयुक्त कृती समितीतर्फे ५ नोव्हेंबर रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ते उच्च शिक्षण संचालक कार्यालयावर धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रलंबित मागण्यांना त्वरित न्याय मिळावा यासाठी राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संयुक्त कृती समिती आणि महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर कर्मचारी महासंघ वतीने आंदोलन पुकारण्यात आले असल्याची माहिती जिल्हा शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष वैभव रोडी, उपाध्यक्ष बाळासाहेब इघे व सचिव संतोष कानडे यांनी दिली.

या मोर्चात जिल्ह्यातील सर्व संघटनाचे पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आंदोलन यशस्वी करावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष प्रकाश म्हसे, महासचिव रावसाहेब त्रिभुवन तसेच संयुक्त कृती समितीचे प्रमुख अजय देशमुख यांनी केले आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत आश्वासित योजनेचे १०,२० आणि ३० वर्षाचे तीन लाभ तात्काळ लागू करणे, विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आठवड्यातून पाच दिवसांचे काम लागू करणे, प्रयोगशाळा व ग्रंथालय परिचरांना सुधारीत ग्रेड पे वेतन लागू करणे, विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तात्काळ भरणे आणि कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे या मागण्यांसाठी शासनाचे लक्ष वेधले जाणार आहे.


नारायण औटी यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - नगर तालुक्यातील नेप्ती येथील नारायण सिताराम औटी (देवा) (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. नारायण औटी हे परिसरात 'नारायण देवा' या नावाने परिचित होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी अश्विनी औटी, पुतणे अभिजीत औटी, अक्षय औटी व अमोल औटी, सुना, जावा तसेच नातवंडे असा परिवार आहे.

अर्जुन मोरे (मोरे मामा) यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील इच्छा मंडप डेकोरेशन व अविनाश फ्लोअर मिलचे मालक अर्जुन अंकुश मोरे (मोरे मामा) (वय ७६) यांचे ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वा. अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार भाऊ, दोन मुले, चार मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. भिमराव, बळीराम, विवेक व ब्रह्मा मोरे यांचे बंधू, आशिष मोरे व अविनाश मोरे यांचे ते वडील होत.

सुरेखाबाई बागडे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सिव्हील हडको, गणेश चौक येथील रहिवासी श्रीमती सुरेखाबाई विनायक बागडे (वय ७७) यांचे १ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे दीर, जावा, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे.

शंकरराव वाघस्कर यांचे प्रदीर्घ आजाराने निधन



भिंगार - वाघस्करगल्ली येथील रहिवासी निवृत्त पोलिस निरीक्षक शंकरराव पुंजाजी वाघस्कर (वय ८७) यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर स्टेशन रोडवरील मल्हार चौकातील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. विजय व शंकर वाघस्कर यांचे ते वडील होत.

नगर शहरासह जिल्ह्यातील काही भागांत सलग ३ दिवस पावसाची हजेरी; पारनेर, जामखेड, पाथर्डीसह जिल्ह्याच्या दक्षिण भागांत अवकाळी पाऊस

नगर - अहिल्यानगर शहर आणि परिसरासह जिल्ह्याच्या काही भागात सलग तीन दिवस मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने हजेरी लावली असून पुढील दोन ते तीन दिवस काही भागांत पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. जामखेड परिसरात १ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन तास, तर पारनेर परिसरात मध्यरात्री सुमारे एक तास जोरदार पाऊस झाला. अर्णव चक्रीवादळाच्या आणि बदलत्या हवामान प्रणालीच्या प्रभावामुळे पारनेर, जामखेड, पाथर्डीसह जिल्ह्याच्या दक्षिण भागांत मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस बरसला. धरण क्षेत्रात मात्र समाधानकारक पाऊस झालेला नाही.

ऐन सणासुदीच्या आणि काढणीच्या दिवसांत या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांची ताराबंळ झाली. दुसरीकडे मात्र ज्याठिकाणी पाऊसच झालेला नाही त्या भागातील विहीरी व कुपनलिकांची पाणीपातळी वाढण्यास या तीन दिवसांच्या पावसामुळे मदत होईल, असाही अंदाज वर्तविण्यात येत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील १-२ दिवस भागात अंशतः ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असून काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात ४ नोव्हेंबरपर्यंत पावसाची हजेरी राहाणार असल्याचा अंदाज जलसंपदाचे सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता तथा हवामान अभ्यासक उत्तमराव निर्मळ यांनी व्यक्त केला आहे. अर्णब चक्रीवादळ उत्तरेकडे गेले असले तरी चक्रीवादळाच्या बाहेरील बाजुचे बाष्पयुक्त ढग अहिल्यानगरसह महाराष्ट्राच्या बहुतांश भागात विखुरले गेले आहेत. या चक्रीवादळाची चक्राकार गती ताशी जवळपास १३० ते १४० किलोमीटरपर्यंत होती. त्यामुळे या बाष्पयुक्त ढगांच्या व्यासीचा परीघ ७०० ते ८०० किलोमीटर पर्यंत होता.

सध्या बंगालच्या उपसागरात नव्याने कमी दाबाची प्रणाली तयार होत असून २ नोव्हेंबरच्या दरम्यान तिचे चक्रीवादळात रुपांतर होईल. हे चक्रीवादळ २ ते ३ नोव्हेंबरच्या दरम्यान आंध्रप्रदेशातील विजयवाड्यानजीक किनारपट्टीला धडकेल. या चक्रीवादळाची चक्राकार गती ताशी ९० ते १०० किलोमीटर असल्याने अर्णब चक्रीवादळाच्या तुलनेत ते फारच सौम्य असेल. अहिल्यानगरसह महाराष्ट्रासाठी या चक्रीवादळाचा फारसा फायदा नसला तरी सध्या जे ढगाळ वातावरण आहे ते ४ नोव्हेंबरपर्यंत टिकुन राहाण्यास मदत होईल, असे निर्मळ यांनी सांगितले आहे.

गृहिणी

आरोग्य

निद्रानाशापासून मिळवा सुटका

शांत आणि गाढ झोप मिळणे हे उत्तम आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे परंतु आजच्या धावपळीच्या युगात अनेकांना निद्रानाशाचा त्रास सहन करावा लागतो ज्यामध्ये रात्री झोपताना काही चुकीच्या सवयींमुळे शरीराचे अंतर्गत घड्याळ बिघडते आणि गाढ झोप लागण्यामध्ये अडथळा निर्माण होतो म्हणूनच रात्री झोपण्याच्या काही तास आधी आणि झोपताना कोणत्या गोष्टी पूर्णपणे टाळल्या पाहिजेत हे जाणून घेणे गरजेचे ठरते. झोपण्यापूर्वी संगणक, दूरदर्शन किंवा भ्रम णध्वनीचा वापर करणे ही आजच्या काळातील सर्वात मोठी सवय ठरली आहे ज्यातून बाहेर पडणारे निळे प्रकाशकिरण मेंदूला दिवस असल्याचा संदेश देतात परिणामी झोप निर्माण करणारा मेलेटोनिन हा घटक तयार होण्याचे प्रमाण कमी होते त्यामुळे पडद्याकडे पाहण्याची सवय रात्रीच्या वेळी पूर्णपणे टाळली पाहिजे. रात्रीच्या वेळी अतिशय गरमागरम किंवा मसाल्याचे तिखट अन्न खाणे टाळले पाहिजे कारण जड अन्नामुळे पाचक संस्थेवर ताण येतो आणि पचनक्रिया मंदावल्यामुळे पोटात जळजळ किंवा अस्वस्थता जाणवते ज्यामुळे गाढ झोपेत अडथळा येतो तसेच झोपण्यापूर्वी चहा किंवा कॉफी पिणे टाळावे कारण त्यात असणारे उत्तेजक घटक मज्जासंस्थेला सक्रिय ठेवतात परिणामी विचार चक्र सुरू राहून शांत झोप लागत नाही. झोपण्याच्या काही वेळ आधी जास्त प्रमाणात पाणी पिणे किंवा भरपेट जेवण करणे टाळावे कारण त्यामुळे रात्रीच्या वेळी वारंवार लघवीसाठी उठण्याचा प्रसंग येतो आणि झोपेचा क्रम भंग पावतो तसेच झोपण्यापूर्वी मनाला अस्वस्थ करणाऱ्या किंवा चिंता वाढवणाऱ्या विषयांवर चर्चा करणे किंवा जुन्या आठवणींमध्ये रमणे टाळले पाहिजे कारण ताणतणाव आणि अतिविचारामुळे मेंदू शांत होत नाही आणि निद्रानाश बळावतो. रात्रीच्या वेळी झोपण्याची आणि सकाळी उठण्याची कोणतीही निश्चित वेळ नसणे ही देखील एक मोठी चुकीची सवय आहे ज्याची पुनरावृत्ती टाळली पाहिजे कारण अनियमित वेळापत्रकामुळे शरीराचे नैसर्गिक चक्र कोलम डते म्हणून झोपण्याच्या वेळेचे योग्य नियोजन करणे आणि खोलीत अंधार व शांतता राखणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरते.

पाककला

पान बासुंदी रोल

साहित्य : गव्हाचे पीठ १ वाटी, मैदा १/२ वाटी, खाण्यायोग्य हिरवा रंग २ थेंब, तूप १ चमचा, दूध १ लिटर, साखर १/२ वाटी, खवा १०० ग्रॅम, बारीक चिरलेली ८ ते १० विड्याची पाने, बडीशेप १ चमचा, गुलकंद २ चमचे, बारीक चिरलेला काजू १ चमचा, बारीक चिरलेला बदाम १ चमचा, वेलची पावडर १/४ चमचा, तुटी फ्रुटी १ चमचा

कृती : प्रथम एका परातीत गव्हाचे पीठ, मैदा, तूप आणि हिरवा रंग घालून मऊसर पीठ मळून घ्या. अर्धा तास झाकून ठेवा. दुसऱ्या बाजूला जाड बुडाच्या कढईत दूध गरम करायला ठेवा. दूध अर्धे होईपर्यंत आटवा. त्यात साखर, खवा घालून घट्ट बासुंदी तयार करा. थंड झाल्यावर त्यात चिरलेली पाने, बडीशेप, गुलकंद, वेलची पावडर आणि सुकामेवा घालून मिश्रण एकजीव करा. आता मळलेल्या पिठाच्या छोट्या पुऱ्या लाटा. तव्यावर दोन्ही बाजूने हलकेच भाजून घ्या. तयार पोळीवर पान बासुंदीचे सारण जाडसर थर देऊन पसरा. त्यावर थोडी तुटी फ्रुटी टाका. हलक्या हाताने घट्ट रोल करा. दोन्ही टोकांना बटर पेपर लावा. सुरीने तिरके तुकडे करून गुलकंद आणि चेरीबरोबर थंड सर्व्ह करा.

वास्तू

* घरात तुळशीचे रोप ईशान्य किंवा पूर्व दिशेला लावावे.
* घरामध्ये सुकलेली झाडे किंवा सुकलेली फुले ठेवू नयेत, ती त्वरित हटवावीत.
* काटेरी किंवा दुधाचा रस गळणारी झाडे घरात लावणे टाळावे.
* उत्तर किंवा पूर्व दिशेला लहान आणि हलकी झाडे लावावीत.

सौंदर्य

केसांना रासायनिक रंगांऐवजी नैसर्गिक मेहंदी किंवा इंडिगो पावडर लावा.

सल्ला

ब्रेड उरल्यास तो मिक्सरमध्ये बारीक करून ब्रेडक्रम्स बनवा आणि एअर टाईट डब्यात फ्रीजरमध्ये ठेवा, कटलेटसाठी कामी येईल.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ३ नोव्हेंबर २०२६

---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, मघा २७।२७, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.

राशिभविष्य

मेष – आज दिवस धावपळीचा राहील. जुने काम पूर्ण होईल.

वृषभ – आज मन प्रसन्न राहील. नोकरीत वरिष्ठांकडून कौतुक होईल.

मिथुन – आज खर्च वाढण्याची शक्यता आहे. मित्रांबरोबर वाद होतील.

कर्क – आज अचानक धनलाभ होईल. रखडलेले काम मार्गी लागेल.

सिंह – आज मान सन्मान वाढेल. नवीन ओळखी होतील.

कन्या – आज दिवस संमिश्र राहील. सकाळी कामात अडथळा येईल.

तूळ – आज जोडीदाराबरोबर मतभेद होण्याची शक्यता आहे.

वृश्चिक – आज आत्मविश्वास वाढेल. स्पर्धा परीक्षेत यश मिळेल.


धनु – आज प्रवासात अडचण येईल. कामाच्या ठिकाणी कामाचा ताण वाढेल.

मकर – आज नोकरीत बदलाचा योग आहे. नवीन संधी मिळेल.


कुंभ – आज पैशाची चिंता दूर होईल. मुलांकडून आनंदाची बातमी मिळेल.

मीन – आज मनात संभ्रम राहील. महत्त्वाचे निर्णय पुढे ढकलले जातील.

शब्दगंध क्र. ७५४९ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७५४८ चे उत्तर



आडवे शब्द :- १) एक तीव्र रेचक औषध ५) घोडशाळा; घोडे बांधण्याची जागा ७) निवारण करणारा ८) पाव; एक चतुर्थांश; पंचवीस टक्के १०) वाणी; जिव्हा; जीभ १२) बागकाम करणारा; बनकर; फुलधर १४) अंदाज; तर्क; अनुमान; अटकळ १६) अतिशय वेगाने १८) देवभाषा; संस्कृत १९) जो मतदान करतो तो २१) गव्हाचे कणीदार पीठ २३) कोपरा २४) भीतीमुळे शरीराचा होणारा कंप २५) कुंपणाचा मोठा दरवाजा

उभे शब्द :- १) तीव्र; तिखट; उग्र २) चोप; ताडन ३) अंगावरून वारे जाणे; पक्षघात; अर्धांगवायू ४) पायाची खोट; जखी ५) एक पक्षी ६) थंड; शीत; एक प्रकारचा दगड ९) तमाशात काम करणारा ११) एक पालेभाजी १३) नाडी; नस; धमनी; रक्तवाहिनी १५) एक चर्मवाद्य; पखवाज; मृदंग १६) या ऋषीने स्वर्गातून पृथ्वीवर गंगा आणली असे म्हणतात १७) तेज; निवास; घर; शरीर २०) हक्क; फिर्याद; दुष्मनी; शत्रुत्व २२) आठवड्यातील कोणताही दिवस; जखम; घाव २३) एक प्रकारचा जाड अंगरखा (इंग्रजी)

* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

सुविचार : जिथे प्रयत्नांची उंची मोठी असते, तिथे नशिबाला वाकावेच लागते.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

लोखंडाला गंज का लागतो? इतर धातूंना का लागत नाही?

लोखंडाला गंज लागणे आणि इतर धातूंवर तसा गंज न चढणे यामागे प्रत्येक धातूचा विशिष्ट रासायनिक स्वभाव, त्यांची अणुरचना आणि वातावरणातील घटकांशी होणारी भिन्न अभिक्रिया कारणीभूत असते. लोखंड हा अत्यंत संवेदनशील धातू असून जेव्हा तो उघड्या हवेत राहतो, तेव्हा वातावरणातील ऑक्सिजन आणि ओलावा म्हणजेच पाण्याच्या सूक्ष्म कणांशी त्याचा थेट आणि जलद संपर्क येतो. या रासायनिक प्रक्रियेमुळे लोखंडाचे ऑक्सिडीकरण होऊन त्याच्या पृष्ठभागावर तांबूस तपकिरी रंगाचा एक ठिसूळ थर तयार होतो, ज्याला आपण गंज असे म्हणतो.

लोखंडाच्या गंजण्याची मुख्य अडचण अशी आहे की हा थर अत्यंत सच्छिद्र आणि हलका असतो. त्यामुळे गंजलेला वरचा थर निघून पडतो आणि आत असलेला नवीन लोखंडाचा भाग पुन्हा हवेच्या आणि पाण्याच्या संपर्कात येतो. ही ऑक्सिडीकरणाची साखळी सतत चालू राहिल्यामुळे लोखंड आतून पोकळ होत जाते आणि कालांतराने पूर्णपणे नष्ट होते.

याच्या उलट इतर धातूंच्या बाबतीत घडणारी रासायनिक प्रक्रिया पूर्णपणे वेगळ्या प्रकारची असते, ज्यामुळे त्यांना लोखंडासारखा विनाशकारी गंज लागत नाही. उदाहरणार्थ, ल्युमिनियम, तांबे, पितळ आणि जस्त हे धातू सुद्धा हवेतील ऑक्सिजनशी अभिक्रिया करतात, परंतु त्यांच्या बाबतीत तयार होणारा ऑक्सिजनचा थर हा अत्यंत घट्ट, सलग आणि मजबूत असतो. हा थर धातूच्या पृष्ठभागावर एका संरक्षक कवचाप्रमाणे चिकटून राहतो. यामुळे हवेतील ओलावा आणि ऑक्सिजन धातूच्या आतल्या भागात प्रवेश करू शकत नाहीत आणि पुढील क्षरणाची प्रक्रिया तिथेच पूर्णपणे थांबते. तांब्याच्या वस्तू काही काळ हवेत राहिल्यावर त्यावर हिरवट रंगाचा थर जमा होतो, तोसुद्धा धातूचे रक्षण करणाराच एक भाग असतो.

तसेच सोने, चांदी आणि प्लॅटिनम यांसारखे मौल्यवान धातू रासायनिकदृष्ट्या अतिशय निष्क्रिय असतात. हे धातू सामान्य वातावरणात हवा, पाणी किंवा कोणत्याही ओलाव्याशी सहज अभिक्रिया करत नाहीत, त्यामुळे त्यांच्या मूळ रूपात किंवा चमकीत कोणताही बदल होत नाही आणि त्यांना कधीही गंज लागत नाही.

अशा प्रकारे, लोखंडावर तयार होणारा गंज धातूला आतून खाऊन टाकणारा असतो, तर इतर धातूंवर वातावरणामुळे तयार होणारा थर उलट त्यांना सुरक्षित ठेवणारी ढाल म्हणून काम करतो. यामुळेच लोखंडाला इतर धातूंच्या तुलनेत अत्यंत वेगाने आणि तीव्रतेने गंज लागतो.

चिकाटी

एका छोट्या गावात समिर नावाचा एक मुलगा राहत होता. समिरला चित्र काढण्याची प्रचंड आवड होती, पण जेव्हा तो चित्र काढायला जायचा, तेव्हा रेषा वेड्यावाकड्या यायच्या आणि रंग बाहेर पसरायचे. वर्गातील इतर मुले सुंदर चित्रे काढायची, पण समिरचे चित्र पाहून सगळे हसायचे. त्यामुळे समिर खूप निराश झाला आणि त्याने चित्र काढणे सोडून देण्याचा विचार केला.

त्याच्या शाळेतील कला शिक्षकांनी समिरची निराशा ओळखली. त्यांनी त्याला जवळ बोलावले आणि पाण्याचा एक माठ दाखवला. त्या माठाखालील दगडावर एक गोल खड्डा पडलेला होता. शिक्षकांनी विचारले, समिर, हा कडक दगड मऊ पाण्याने कसा कोरला गेला असेल? समिरने विचार करून उत्तर दिले, पाण्याचा एक एक थेंब सतत एकाच जागेवर पडल्यामुळे. शिक्षक हसले आणि म्हणाले, अगदी बरोबर! पाण्याचा एक थेंब कमकुवत असतो, पण तोच थेंब जेव्हा न थांबता सतत एकाच ठिकाणी पडतो, तेव्हा कडक दगडालाही आकार देतो. चित्रकलासुद्धा अशीच आहे.

शिक्षकांचे बोलणे समिरच्या मनात घर करून गेले. त्याने ठरवले की तो हार मानणार नाही. त्याने रोज नियम बनवला की रोज संध्याकाळी किमान एक तास चित्र काढायचा सराव करायचा. सुरुवातीला चित्रे पुन्हा बिघडली, हात दुखू लागला, पण त्याने सराव सोडला नाही. प्रत्येक चुकीतून तो शिकत गेला आणि दररोज आधीपेक्षा थोडे चांगले चित्र काढू लागला.

काही महिन्यांनंतर शाळेत वार्षिक चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. सर्व मुलांनी भाग घेतला. समिरनेही अत्यंत एकाग्रतेने आणि चिकाटीने निसर्गचित्र काढले. जेव्हा स्पर्धेचा निकाल जाहीर झाला, तेव्हा पहिला क्रमांक समिरचा आला होता. त्याचे चित्र पाहून सर्व शिक्षक आणि वर्गमित्र अवाक झाले. ज्या मुलांनी पूर्वी त्याची टवाळी केली होती, त्यांनीही उठून टाळ्या वाजवल्या.

सततचा सराव आणि चिकाटी यांच्या जोरावर समिरने आपल्या अपयशावर मात करून यश मिळवले होते.

बोध: कोणत्याही कामात सुरुवातीला अपयश आले तरी खचून न जाता सतत सराव आणि चिकाटी ठेवली, तर अशक्य वाटणारी गोष्टही शक्य होते.

आत्मशक्ति



पाहता आहात ज्या गोष्टी तुम्ही ऐकता आहात त्या पाहण्याची व ऐकण्याची तुमच्या म हात्म्यांनी व धर्मात्म्यांनी इच्छा केली होती परंतु ते त्या पाहू व ऐकू शकले नाहीत.ज्योति आणि श्रुतिच्या धारा सूक्ष्म असतात. त्यांची अनुभूती आम्ही ह्या भौतिक डोळ्यांनी आणि कानांनी घेऊ शकत नाही परंतु अंतर्गत डोळा आणि अंतरीय कानांनी मात्र तसा अनुभव येऊ शकतो. म्हणून बाबाजींना आंतरिक आवाजाला सांगत की अंतरीय वेगाने ऐकला परंतु समूह शकत नाही. म्हणजे 'शब्द' तुमच्या बाह्य कानांनी ऐकू येणार नाही परंतु आंतरिक ध्यान केंद्रीत करून ऐकू शकतात. जेव्हा आम्ही आत्मज्योतीत पहातो तेव्हा दिव्य तेज प्रकाशात येत नाही किंवा ते डोळ्यांच्या समोरील

अध्यात्मिक शक्ती

मुखडे पाहिचत नाही तर तो आत्मसाक्षात्कार पहिला येतो.

गुरु नानक देवजी म्हणतात –भिणउ बिसाउ धुनि जाणिअै अकथ कहावै सोइ।। समझिअै बिषु हीआवाला खाव खरोरि होइ।। (सिरी राग म १, ९१)उपनिषदांमध्ये आले आहे, नादधर (ध्वनीवर) ध्यान केंद्रीत केल्याने मोक्षाचा मार्ग प्राप्त होतो.

मौलाना रूमसाहेबांनी म्हटले आहे की, डोका वेडा नका तर स्वर्गातून खाली येणाऱ्या आवाजाला ऐका. त्यांनी आम्हाला पुढे म्हटले आहे की, हे शूर आत्म्या, तुझ्याजवळ वर आणि बचाव वरून येणाऱ्या मधुर ध्वनीला ऐक.मोहम्मद साहेबांनी म्हटले आहे की,परमेश्वराचा आवाज माझ्या कानापर्यंत इतर आवाजांपेक्षा येतो.जैन धर्मग्रंथात लिहिलेले आहे –जिज्ञासू साधकांना असा आदेश देण्यात येतो की,

त्यांनी एकांतात एकाग्रचित्त होऊन बसावे आणि पंचतत्वांच्या महाराजावर ध्यान टिकवावे आणि ज्योतीला पहाव आत्मज्ञानाचा मार्गजर आम्ही आत्मिक ज्योति आणि श्रुतीवर ध्यान केंद्रीत केले तर आम्ही आपले लक्ष्य गाठू शकू. शिवनेत्रावर ध्यान केंद्रीत करून आम्ही ध्वनी सुरुवात करतो आणि तेच आपल्या शरीराचा त्याग करणे, ज्योति आणि श्रुतीच्या धारा सरळधारापासून निरंतर आम्ही त्याच्या दिव्य संगीताला पकडू शकतो. आणि ह्या धारांवर बसून त्याच्या उगमापर्यंत (परमेश्वरापर्यंत) पोहोचू शकतो.

ध्यानाभ्यासाचे वेळी मनाला स्थिर कसे करावे? मन सदैव चंचल स्थितीत राहते. (क्रमश:)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सर्वात महत्त्वाचं म्हणजे साधा विचार करण्याची गरज आहे. जर पूर्ण वेळ आपल्या मनात कोलाहल असेल आणि आपला स्वाभिमान कदाचित त्यावर अवलंबून असेल तर मन शांत ठेवणं आपल्याला अवघड होईल. आज आपल्यापैकी कित्येक जण, करिअर किंवा नाती यांसारखे आजूबाजूचे महत्त्वाचे निर्णय इतरांच्या मतांप्रमाणे घेतात. अनेकदा हे निर्णय चुकतात. आपल्या करिअरचा मार्ग ठरवण्याच्या एखाद्या विद्यार्थ्याचं उदाहरण घेऊ या. त्याचे संस्कार आणि त्याचं कार्मिक खातं या दोन महत्त्वाच्या घटकांवर तो हा निर्णय घेईल. तो अंतःप्रेरणेने त्या बाजूकडे ओढला जाईल. त्याच्या आजूबाजूचे लोक त्याच्या मताच्या विरोधात मत देतील. ते सगळे जरी बरोबर असले तरीही अंतिम निर्णय त्या विद्यार्थ्यालाच घ्यायचा आहे. म्हणून त्याच्या आवडीप्रमाणे आणि क्षमतेप्रमाणे त्याने तो घ्यायला हवा.कोणताही निर्णय घेतल्यानंतर आपल्याला सकारात्मक आणि

नाती घट्ट विणू या

नकारात्मक प्रतिक्रिया मिळतात, त्यामुळे आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या संदर्भाप्रमाणे अंतिम निर्णय घेणं सर्वात उत्तम. यामुळे आपलं जीवन अत्यंत सरळ आणि साधं बनेल. सुरेश ओबेरॉय : हो, आज माझे आयुष्य साधं–सोपं आहे. १९९०च्या दशकात, माझ्या कुटुंबातील आणि मित्रपरिवारातील बहुतांश सदस्यांनी चित्रपटात करिअर करू नकोस, ते क्षेत्र व्यावसायिक घराण्यातील व्यक्तीला शोभणार नाही असा सल्ला दिला होता.

शिवानीदीदी : जर तुम्ही त्यांच्या मताप्रमाणे वागला असता तर आता तुमचं आयुष्य खूप वेगळं असतं.

सुरेश ओबेरॉय : मी खूप दुःखी असतो. इतर अभिनेत्यांना चित्रपटात काम करताना बघून मला स्वतःबद्दल वाईट वाटलं असतं.

शिवानीदीदी : कारण तुम्ही समाजाच्या मतासाठी स्वतःच्या अंतःप्रेरणेला दाबून टाकलं असतं. आजकाल आपण, 'मी हे केले नाही तर लोक काय म्हणतील,' या विचाराने अनेक रीतीरिवाज सांभाळतो, परंपरा पुढे नेतो, रितीरिवाजांचे आयोजन करतो. काहींना शारीरिक व्याधीमुळे नुसताच एक दिवस उपवास करणं त्रासदायक वाटतं तरीही इतरांच्या नजरेत चांगले बनण्यासाठी ते उपवास करतात. आपण धार्मिक विधीमुळे सामाजिक दबावाखाली सगळं करतो तर त्यामागचा शुद्ध हेतू आपल्याला साफ करता येणार नाही. आपला हेतूपुढे भेसळ असेल.सुप्त अवस्थेत : हेतू हा शब्द मला आवडला.शिवानीची : हा कशामागे दडलेला हेतू आहे. जर आपण आपल्या घरी जाणार, कोणीतरी काही रेझ्युमे आपल्याकडे आणि आपल्या त्याच्या बरोबरच्या नाचायला करायला हवे. (क्रमश:)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

नवरा : अगं, आज भाजीला जराही चव नाहीये!
बायको : शांत बसा हो... टीव्हीवरचा स्वयंपाकाचा कार्यक्रम बघून बनवली आहे!

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* ऑक्टोबर २०२६ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या सरचिटणीस पदी कोणाची फेरनिवड झाली आहे? – अँटोनियो गुटेरेस

– अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

किंवा त्याहून अधिक असावे. स्त्री व पुरुष दोघे मात समान स्वभाव, स्त्री रूपवंत, चारित्र्यवान असावी. तसेच पुरुषशील, श्रीमंत व चारित्र्यवान असावा. स्त्री व पुरुष यांच्यातील गुणांचा विचार करूनच विवाह केला पाहिजे. आधुनिक काळामध्ये स्त्री व पुरुषाचे एकमेकाला तृप्त करण्यासाठी केलेला विवाह करावा.

१४) वानप्रस्थ संस्कार : गृहस्थाश्रमातील सर्व कर्तव्ये पार पडल्यानंतर आपली मुले जेव्हा मोठी होतात, तेव्हा त्यांच्याकडे गृहस्थाश्रमाची जबाबदारी सोपवून ईश्वराची श्रद्धा, भक्ती, सामाजिक सेवा याकडे मन व शरीर वळविणे यालाच वानप्रस्थ

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

संस्कार म्हणतात. ही भौतिक जीवन त्यागाची पहिली पायरी असते.

१५) संन्याससंस्कार :

स्वार्थाचा त्याग करून संपूर्ण विश्वास कल्याण करण्यासाठी संन्यास करतात. या संस्कारापासून मोक्षप्राप्तीचा आनंद मिळविता येतो.

१६) अंत्येष्टिसंस्कार :

मृत्यूनंतर करण्यात येणारा हा अंतिम संस्कार. ज्याचा उत्तम गती मिळविण्यासाठी अंत्येष्टिसंस्कार केला जातो. हा संस्कार पवित्रतेला आणि देहाला केला जातो. अशा प्रकारे भारतीय संस्कृतीमध्ये बालकाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत सोळा संस्कार सांगितले आहेत.

९ गर्भावस्थेत डॉक्टरांकडे कधी जावे? हिली भेट : गर्भवती स्त्रीच्या दृष्टीने डॉक्टरांकडे पहिली भेट फार महत्त्वाची असते. आपल्या शरीरामध्ये सर्व माहिती तिने डॉक्टरांना द्यावी.

(क्रमश:)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

ग्रीन सिटी मोहिमेत १५ हजार वृक्षलागवड व संवर्धनाचे उद्दिष्ट पूर्ण

आमदार योगेश टिळेकर



पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत अहिल्यानगर शहरात एक लाख वृक्षलागवड व संवर्धनाचा संकल्प करण्यात आला असून आतापर्यंत १५ हजार वृक्षलागवड व संवर्धनाचे उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. या मोहिमेच्या पुढील टप्प्यात साई द्वारका सेवा ट्रस्ट आणि अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षवाटप उपक्रमाचा शुभारंभ आमदार योगेश टिळेकर यांच्या हस्ते झाला. (छायाचित्र : लहू दळवी)

साई द्वारका सेवा ट्रस्ट अन महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने वृक्षवाटप

नगर– पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत अहिल्यानगर शहरात एक लाख वृक्षलागवड व संवर्धनाचा संकल्प करण्यात आला आहे. यापैकी आतापर्यंत १५ हजार वृक्षलागवड व संवर्धनाचे उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. या मोहिमेच्या पुढील टप्प्यात साई द्वारका सेवा ट्रस्ट आणि अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षवाटप उपक्रम राबविण्यात आला. उपमहापौर धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या या उपक्रमाचे आमदार योगेश टिळेकर यांनी कौतुक केले.

आ. टिळेकर म्हणाले की, समाजात वावरत असताना समाजाचे आपल्यावर काहीतरी ऋण आहे, या भावनेतून प्रत्येकाने आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. पुढील पिढीसाठी आपण काय ठेवणार, याचा विचार करताना संपत्ती, गाडी आणि बंगला यापेक्षा वृक्षांची सावली आणि पाण्याचे संवर्धन यासाठी काम करणे अधिक महत्त्वाचे आहे. पाणी आणि वृक्षसंवर्धन हे आज समाजासमोरील महत्त्वाचे प्रश्न आहेत.

काँक्रीटची जंगले उभी राहत आहेत

निसर्गाचा ऱ्हास होत असून, काँक्रीटची जंगले उभी राहत आहेत. या प्रक्रियेत वृक्षतोड होत असली, तरी त्या प्रमाणात प्रामाणिकपणे वृक्षलागवड व संवर्धनाचे प्रयत्न होताना दिसत नाहीत. अशा परिस्थितीत धनंजय जाधव यांनी ग्रीन सिटी मोहिमेच्या माध्यमातून वर्षभरात एक लाख वृक्ष लावण्याचा संकल्प केला आहे. त्यापैकी १५ हजार वृक्षलागवड व संवर्धनाचे उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. पुढील पिढीच्या भवितव्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण आहे, असे आ. टिळेकर म्हणाले.

सर्वांची सामूहिक जबाबदारी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रात हरितक्रांती घडविण्याचे काम सुरू आहे. शेतकरी, बळीराजा आणि सर्वसामान्य नागरिक सुखी व समाधानी व्हावेत, या भूमिकेतून शासन विविध प्रयत्न करत आहे. पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेच्या माध्यमातून अहिल्यानगरची ओळख महाराष्ट्रात हरित अहिल्यानगर म्हणून निर्माण होईल. वृक्षारोपण आणि संवर्धन ही केवळ एखाद्या व्यक्तीची जबाबदारी नसून ती सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. देश आणि राज्याच्या विकासासाठी युवकांनी पुढाकार घेऊन ग्रीन सिटी अहिल्यानगर मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन आ टिळेकर यांनी केले.

नागरिकांचाही वृक्ष संवर्धन मोहिमेत सहभाग

नगरसेवक निखिल वारे म्हणाले की, उपमहापौर धनंजय जाधव यांनी वृक्षारोपण आणि संवर्धनाची लोकचळवळ उभी केली आहे. या माध्यमातून शहरात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड झाली असून, नागरिकांनीही वृक्षांच्या संवर्धनासाठी सहभाग घेतला आहे. आगामी काळात पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता असल्याने त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. उपमहापौर या दिशेने प्रयत्न करत आहेत. वृक्षारोपणाशिवाय पर्यावरणाचा समतोल राखणे शक्य नाही. ऋतुमानाचा समतोल टिकविण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड आणि त्यांचे संवर्धन होणे आवश्यक आहे. यासाठी नागरिकांनीही पुढाकार घेऊन वृक्षारोपणाची लोकचळवळ उभी करावी, असे आवाहन वारे यांनी केले.

वृक्ष लागवडीसोबत संवर्धन आवश्यक

उपमहापौर जाधव म्हणाले की, पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत आतापर्यंत १५ हजार वृक्षलागवड व संवर्धनाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे. सध्या पावसाचे आणि पाण्याचे प्रमाण कमी असल्यामुळे वृक्षलागवडीसमोर आव्हान निर्माण झाले आहे. त्यामुळे नागरिकांनी कमी पाण्यावर वाढू शकणाऱ्या वृक्षांची लागवड करण्यावर भर द्यावा. वृक्ष लावण्याबरोबरच त्यांचे नियमित संवर्धन करणेही तितकेच आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, बाबासाहेब सानप, रोहन सानप, अभिजीत बोरुडे, ॲड. सुधीर पोटे, गणेश विद्ये, अमोल बागुल आदी उपस्थित होते.

प्रेरणादायी अक्षरधन

गळो कधी न धैर्य अंतरातले





संकट आले. मन भ्याले. धैर्य गळाले. कुणी मदतीला नाही आले स्वत:चेही अवसान गळाले? मग जगणंच व्यर्थ झाले. पण नको ना तसे व्हायला ? अरे, माणसा जीवन सुखी नको का व्हायला ? मगं संकटावर हवीच मात करायला.

संकटाला घाबरायचं कशाला? हिमतीनं उभं राहायचं तोंड द्यायला. भय वाटते मग तुमचेच संकटाला. लागते संकट स्वत:च पळायला. विजयश्री मग धावते तुम्हाला वरायला. संकटाशी झुंजणे आवश्यक, आपले भले साधायला.

पण कधी कधी त्यासाठी जीव घालावा लागतो धोक्यात. पण एरवी संकट यायचं कसं आटोक्यात? पण जीव धोक्यात घातला की जीव गेला, असं का घाबरायचं? धोका नाही कुठे? पदोपदी ठेच लागे. जीवनात ठायीठायी खाचखळगे। जो धोक्यांचाच विचार मनी बाळगे, तो कसा आनंदाने जगे ? संशयच नाही आणायचा मनात. कसूर ठेवायची नाही प्रयत्नात. मग झोक्यावर बसून झुलायचं, धोक्याला झुलवायचं, दूर घालवायचं, आनंदानं जीवन घालवायचं.

एका अरण्यात ससे राहायचे एका बिळात. एकदा ते बाहेर पडले आणि अकस्मात सिंहाने पुढे ठाण मांडले. ससे घाबरले. काही पळत सुटले पण एक ताठ उभा राहिला. सिंहाला त्याचे कौतुक वाटले. पण रागही आला. सिंह म्हणाला, तुला मरणाचे भय नाही वाटले? तुझे साथी पळाले, पण तू कसे निर्भयपणे उभे राहणे स्वीकारलेस?

ससा म्हणाला, महाराज, तुमच्यासाठी मरणे तर स्वर्गाला जाणे. त्यासाठी कशाला भिणे? तुम्ही आमचे राजे. पण आज मी उभा राहिलो ते वेगळ्या कारणे. उद्यापासून तुमचे राजपद संपणे.

सिंह रागावला, म्हणाला, का?

ससा म्हणाला, दुसरा शूर तरुण सिंह आलाय या जंगलात. त्याने मारलीत अनेक जनावरे. उद्या तुम्हालाही दाखवणार आहे तो हात.

सिंह ओरडून म्हणाला, हे शक्य नाही. मी उद्या उजाडूच देत नाही. आजच मारतो त्या सिंहाला. दाखव कुठय तो ?

ससा त्याला घेऊन एका दरीकडे गेला व म्हणाला, या दरीत तो दडलाय. सिंह म्हणाला, तू हो पुढे दाखव मला.

ससा घाबरून म्हणाला, मला त्याचे भय वाटते. मी मरायचे, ते आमच्या राजासाठी. आगुंतकासाठी नाही.

सिंह म्हणाला, मग तो कुठे आहे ते कसे ओळखायचे ? दरीत कुठल्या जागी शोधायचे?

ससा म्हणाला, तुम्ही आरोळी ठोका. तो उत्तर देईल. त्या आवाजाच्या रोखाने तुम्ही झेप घ्या.

सिंहाने आरोळी ठोकली. दरीतून त्याला प्रत्युत्तर आले. सिंहाने चिडून झेप घेतली. दरीतली आरोळी त्या सिंहाच्याच आरोळीचा प्रतिध्वनी होता. सिंह फसला. ससा हसला, सिंह दरीत पडून मेला. सशाने संकटावर विजय मिळविला. **– किशोर गांधी**

द ग्रीन व्हॅली प्रीस्कूलमध्ये चिमुकल्यांनी घेतला जपानी संस्कृतीचा अनुभव

नगर – अहिल्यानगर येथील द ग्रीन व्हॅली प्रीस्कूलमध्ये जपानचा पारंपरिक शरद ऋतू उत्सव अकीमत्सुरी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवामध्ये जपानी भाषा, संगीत, नृत्य आणि लोककथांच्या माध्यमातून चिमुकल्यांना जपानची संस्कृती, परंपरा आणि निसर्गसौंदर्याची अनोखी ओळख करून देण्यात आली. विविध उपक्रमांतून चिमुकल्यांनी या उत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

जपानमधील शरद ऋतू निसर्गसौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे. या काळात बर्फाच्छादित माऊंट फुजी पर्वताच्या परिसरातील मॅपल वृक्षांची लाल, केशरी आणि पिवळी पाने निसर्गाला मनोहारी रूप देतात. याच संकल्पनेवर आधारित शाळेतील नोटीस बोर्ड आणि डिस्प्ले बोर्ड शिक्षिकांनी आकर्षक पद्धतीने सजविले होते. त्यावर माऊंट फुजी पर्वत आणि रंगीबेरंगी मॅपल पानांचे सुंदर चित्रण करण्यात आले होते.

शाळेच्या संचालिका प्राचार्या उमंग नंदा यांनी सांगितले की, शाळेत जपानी भाषा शिकविली जात असल्याने विद्यार्थ्यांना जपानी भाषा, माऊंट फुजी पर्वत आणि तेथील संस्कृतीची आधीपासूनच ओळख आहे. या उत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जपानच्या परंपरा आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये अनुभवण्याची संधी मिळाली.कार्यक्रमात



द ग्रीन व्हॅली प्रीस्कूलमध्ये चिमुकल्यांनी घेतला जपानी संस्कृतीचा अनुभव स्कूलमध्ये अकीमत्सुरी उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांसमवेत संचालिका प्राचार्या उमंग नंदा आदींसह शिक्षक. (छायाचित्र : समीर मन्यार)

काही विद्यार्थ्यांनी जपानी भाषेत स्वतःची ओळख करून दिली, तर काहींनी जपानी भाषेत माऊंट फुजी पर्वताची माहिती सांगितली. विद्यार्थ्यांनी जपानी गाण्यांवर नृत्य सादर केले. प्ले ग्रुप आणि नर्सरीच्या चिमुकल्यांनी किरा किरा हिराकू या लोकप्रिय जपानी गाण्यावर केलेल्या नृत्याने उपस्थितांची मने जिंकली.त्सुकी नो उसागीङ्ग (चंद्रावरील ससा) ही जपानी लोककथा. या कथेतून विद्यार्थ्यांना जपानच्या लोकसाहित्याची ओळख झाली. तसेच भारतीय कोजागिरी पौर्णिमा आणि जपानमधील ओत्सुकिमी या चंद्रदर्शनाच्या परंपरेतील साम्यही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. ओत्सुकिमी उत्सवात कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र येऊन शरद ऋतूतील पौर्णिमेच्या चंद्राचे सौंदर्य अनुभवतात ही माहितीही विद्यार्थ्यांना देण्यात आली.

लहान वयातच विद्यार्थ्यांना विविध देशांच्या भाषा, संस्कृती, परंपरा आणि जीवनशैलीची ओळख करून देऊन त्यांच्यामध्ये जागतिक दृष्टिकोन, सांस्कृतिक कुतूहल आणि विविधतेविषयी आदर निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या अभिनव उपक्रमामुळे चिमुकल्यांना जपानविषयी नव्या गोष्टी शिकण्याची संधी मिळाली असे प्राचार्या नंदा म्हणाल्या . कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वर्षा कुळथे,वैशाली,शीतल सोनटक्के, मिस विद्या, मिस समृद्धी आणि मिस धनश्री यांनी परिश्रम घेतले.

कर्करोगाविषयी मनात भीती नको योग्य माहिती हवी

डॉ. प्रियंका पठारे



अपंग संजिनी सोसायटी, मूकबधिर विद्यालय सावेडी,अहिल्यानगर व डी.बी. फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत कॅन्सर तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन दीप प्रज्वलनाने कॅन्सर तज्ज्ञ डॉ. प्रियंका पठारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संघर्ष प्रतिष्ठानच्या अध्यक्षा किरण बारस्कर डॉ. आश्विनी बोरुडे डी.बी. फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा दिपाली भावले,चेअरमन.मधुकर भावले आदी उपस्थित होते. (छायाचित्र : समीर मन्यार)

नगर – कर्करोग म्हणजे काय आणि तो कशामुळे होतो याची माहिती असणे गरजेचे आहे दिवसेंदिवस कर्करोगांच्या रुग्णांचे प्रमाणे वाढत आहे. कर्करोगाविषयी मनात भीती नको, योग्य माहिती हवी, लक्षणांकडे दुर्लक्ष नको वेळेवर तपासणी करायला हवी असे प्रतिपादन विखे मेमोरियल हॉस्पिटलच्या कर्करोगतज्ञ डॉ. प्रियंका पठारे यांनी केले.

अपंग संजिनी सोसायटी, मूकबधिर विद्यालय सावेडी, अहिल्यानगर व डी.बी. फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत कॅन्सर तपासणी व मार्गदर्शन शिबिरा प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी संघर्ष प्रतिष्ठानच्या अध्यक्षा किरण बारस्कर, डॉ. आश्विनी बोरुडे डी.बी. फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा, खजिनदार दिपाली भावले–ताटे, चेअरमन मधुकर भावले, संचालिका विद्या भावले, डॉ. गिरीश वाठ, सुभाष पठारे, माजी नगरसेविका मिना बोज्ञा, दिलीप जगधने, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक उपस्थित होते.

डॉ.पठारे म्हणाल्या की, आपले शरीर वेगवेगळ्या पद्धतीच्या पेशींनी बनलेले असते. या पेशी नॉर्मल वेगाने डिव्हाईड होत असतात. या पेशी जेव्हा अनियमित आणि अनियंत्रित प्रमाणात वाढतात, तेव्हा त्या आपल्या शरीरामध्ये गाठ बनवतात. गाठ ही चांगल्या प्रकारची (बिनाईन) जी न पसरणारी आणि शरीराच्या इतर भागात न जाणारी असू शकते, ज्याला आपण कॅन्सर म्हणत नाही. परंतु, ज्या गाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी रक्ताद्वारे किंवा लिम्फॅटिक सिस्टीमद्वारे पोहोचू शकतात, त्यांना (मॅलिग्नंट) म्हणजेच कर्करोग असे म्हणतात. कर्करोग हा अजिबात संसर्गजन्य आजार नाही. पेशींची रचना अनियमित पद्धतीने झाल्यामुळे किंवा पेशी वाढल्यामुळे आजार तयार होतो.

भारतामध्ये कर्करोगाचे सर्वात महत्त्वाचे कारण तंबाखू, गुटखा, पान मसाला, सिगारेट, बीडी आणि महिलांमध्ये मिश्री लावणे हे आहे. तंबाखू आणि दारू दोन्हीचे सेवन करणाऱ्यांमध्ये कर्करोगाची तिप्पट किंवा त्याहून अधिक जोखीम असते. अयोग्य आहार जंक फूड पिझ्झा–बर्गर खाणे यामुळे गर्भाशयाचा कॅन्सर, ब्रेस्ट कॅन्सर आणि पोटाचे किंवा आतड्याचे कॅन्सर होण्याची कारणे आहेत. भारतीय महिलांमध्ये स्तनाचा कर्करोग वाढत्या प्रमाणात आढळतो. स्तनात गाठ किंवा गाठीमध्ये गाठ असणे, त्वचेमध्ये बदल होणे, त्वचा आत ओढली जाणे किंवा कडकपणा असणे ही याची लक्षणे आहेत, असे डॉ. पठारे म्हणाल्या.

गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग हा महिलांमध्ये आढळणारा आणखी एक प्रमुख कर्करोग आहे. वाढत्या वयात पाळी अनियमित होणे, पाळी बंद झाल्यानंतर रक्तस्त्राव होणे किंवा संभोगानंतर रक्तस्त्राव होणे ही याची लक्षणे आहेत. लक्षणे दिसण्यापूर्वी किंवा अगदी सुरुवातीच्या स्टेजला कर्करोग शोधून काढण्यासाठी आणि त्यावर लवकर उपचार सुरू करण्यासाठी स्क्रीनिंग तपासण्या करणे महत्त्वाचे आहे. कर्करोग सुरुवातीच्या टप्प्यात असेल तर सर्जरी करून गाठ काढून टाकणे हा सर्वात प्रभावी उपाय आहे. कर्करोग हा पूर्णपणे बरा होऊ शकतो महिलांनी संकोच न बाळगता लक्षणे दिसल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा असेही त्या म्हणाल्या.

प्रास्ताविक दिपाली भावले–ताटे यांनी केले. यावेळी किरण बारस्कर, डॉ.आश्विनी बोरुडे, संचालिका विद्या भावले यांनीही उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले.

मुख्याध्यापक आर. बी. भांड यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.



कापड बाजार जैन मंदिर ट्रस्टच्या वतीने दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विविध ठिकाणच्या गोशाळांना आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते हिरव्या चाऱ्यासाठी आर्थिक मदतीचे धनादेश देण्यात आले.

कापड बाजार जैन मंदिर ट्रस्टतर्फे गोशाळांना आर्थिक मदतीचा हात

नगर – कापड बाजार जैन मंदिर ट्रस्टच्या वतीने दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विविध ठिकाणच्या गोशाळांना आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते हिरव्या चाऱ्यासाठी आर्थिक मदतीचे धनादेश देण्यात आले. प्रारंभी मुनीराज श्री हितप्रेम विजयजी म. सा., मुनीराज श्री ज्ञानप्रेम विजयजी म. सा. यांनी मांगलिक दिली व जीवदयाचे महत्त्व समजून सांगितले.

याप्रसंगी जैन मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सुभाष मुथा, ट्रस्टी संघवी सीए राजेशभाई शहा, संघवी लालचंद कासवा, विनोदभाई शहा, डॉ. सागर पटवा, जितेंद्रभाई पोरवाल, राजूभाई बी.शहा, संजयभाई बेदमुथा, महेंद्रभाई मेहेर, जयकुमार पुंगलिया, नगरच्या पांजरपोळ गोरक्षण संस्थेचे मॅनेजर राजू पितळे, निंबळक येथील निसर्गसृष्टीचे गौतम कराळे व सुरेंद्र सोनवणे, अरूणोदय गोशाळेचे संजय कटारिया व मनिष फुलडहाळे, व्यापारी मुन्ना मुनोत उपस्थित होते.

ट्रस्टच्या वतीने निंबळक, नगर पांजरापोळ, अरूणोदय गोशाळा, संगमनेर, मिरी, आश्वी, बार्शी, श्रीगोंदा, सांगोला (पंढरपूर), करमाळा, वर्धा, भंडारा, पाबळ, यादगीर (कर्नाटक) येथील गोशाळांना आर्थिक मदत करण्यात आली आहे.



नगरच्या महावीर इंटरनॅशनलच्या वतीने महावीर भोजनालयास आरो जल शुद्धीकरण मशीन देण्यात आले.

महावीर इंटरनॅशनलतर्फे भोजनालयास जल शुद्धीकरण मशीन भेट

नगर – महावीर भोजनालयास महावीर इंटरनॅशनल अहिल्यानगर केंद्रातर्फे आरो जलशुद्धीकरण मशीन भेट देण्यात आले. मशीनसाठी सतीश (बाबुशेठ) लोढा यांचे सहकार्य लाभले. दिल्ली जैन कॉन्फरन्सचे सदस्य संजय कोठारी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमास महावीर इंटरनॅशनलचे अध्यक्ष राजेंद्र बोथरा, महिला विभागाच्या अध्यक्षा वर्षा बाफना आदींसह सदस्य उपस्थित होते.

संजय कोठारी म्हणाले, अहिल्यानगरमध्ये महावीर इंटरनॅशनलच्या जिथे गरज आहे तेथे ही संस्था पोहचत आहे. सर्वसामान्य नागरिकांना मदतीचा हात देत होणारे हे कार्य कौतुकास्पद आहे.

सतीश लोढा म्हणाले, महावीर भोजनालयात सर्वसामान्य नागरिकांना अत्यल्प दरात भोजन मिळत आहे. येथे सर्वांना सात्विक भोजना बरोबरच पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे यासाठी महावीर इंटरनॅशनलने पुढाकार घेतला. त्यांना आरो जल शुद्धीकरण मशीनसाठी लोढा परिवाराने सहकार्य केले आहे.

प्रास्ताविकात राजेंद्र बोथरा यांनी सांगितले, नागरिकांना शुद्ध व निर्जंतुक पिण्याचे पाणी मिळावे यासाठी महावीर इंटरनॅशनल नगर केंद्राच्या माध्यमातून अनेक ठिकाणी आरो जल शुद्धीकरण मशीन देण्यात आले आहेत. हे मशीन उपलब्धतेसाठी बाबुशेठ लोढा यांचे सहकार्य लाभले आहे.

यावेळी नरेंद्र बाफना, दिलीप कर्नावट, उज्वला लोढा, स्नेहल बोथरा, सतीश चोपडा, सतीश बोथरा, दिलीप कटारिया, मिलाप पटवा, युवा अध्यक्ष चेतन संचेती, संजय लोढा, अमित लोढा, अमित पटवा आदी सदस्य उपस्थित होते.

महेश नागरी सहकारी पतसंस्थातर्फे लाभांश वाटप



महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या. भिंगारच्या सभासदांना डिव्हिडंड वाटप करताना संस्थेचे चेअरमन डॉ. अशोक चंगेडे, संचालक संजय सपकाळ, कांतीलाल बोरा, नितीन शिंगवी, संजय मुनोत, सुदाम गांधले, व्यवस्थापक राजेंद्र मेहेर आदी.

नगर – महेश नागरी सहकारी पतसंस्था, मेन रोड, भिंगार या पतसंस्थेचा सन २०२५ – २०२६ या सालचा लाभांश वाटप १५ टक्के दराने ३० ऑक्टोबर पासुन मुख्यालयात चेअरमन डॉ. अशोक शांतीलाल चंगेडे, संचालक संजयकुमार माधवराव सपकाळ, कांतीलाल मोतीलाल बोरा, नितीन पोपटलाल शिंगवी, संजय शांतीलाल मुनोत, सुदाम तुळशीराम गांधले यांच्या हस्ते संस्थेचे सभासद प्रमोद मुनोत, सुनिल दळे, राजेंद्र गांधी, संपत बेरड यांना लाभांश देऊन सुरु करण्यात आला.

यावेळी पतसंस्थेचे प्र. व्यवस्थापक राजेंद्र मेहेर व संस्थेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

संस्थेने यावर्षीही १५% लाभांश दिला आहे. तरी संस्थेच्या सर्व सभासदांनी मुख्यालयातुन अथवा शाखा आडते बाजार येथुन आपला लाभांश घ्यावा असे आवाहन चेअरमन डॉ. अशोक चंगेडे यांनी केले आहे. तसेच आपल्या सभासदांसाठी अनेक सुविधा उपलब्ध करुन दिल्या. लाईट बील भरणा केंद्र, लॉकर्स सुविधा, संस्थेने सभासदांसाठी ठेवीवर आकर्षक व्याजदर ठेवलेले आहे. ७३१ दिवसांसाठी उच्चतम ९% व्याजदर ठेवलेले आहे. सोनेतारण कर्जावर देखील व्याजदर ९% ठेवलेले आहे. अटी व शर्ती नुसार संस्थेची स्वमालकीच्या सुसज्ज इमारतीत प्रशिक्षित कर्मचारी सेवा देतात. त्यामुळे संस्थेकडे ठेवी ठेवण्यास व सोनतारण कर्ज घेण्यास सभासदांची गर्दी असते.

आनंदऋषीजी रुग्णालयात तिळ्यांची सुखरूप प्रसूती



नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये ३१ वर्षीय महिलेची तिळ्यांची (तीन बाळांची) प्रसूती सिझेरियन शस्त्रक्रियेद्वारे यशस्वीरीत्या करण्यात आली. विशेष म्हणजे, ही गर्भधारणा नैसर्गिकरीत्या झालेली असल्याने ही घटना वैद्यकीय क्षेत्रात अत्यंत दुर्मिळ मानली जात आहे.

सदर महिलेच्या पहिल्या तिमाहीतील सोनोग्राफीमध्ये तीन बाळांची गर्भधारणा असल्याचे निदान झाले होते. ही बाब समजल्यानंतरही महिलेने आत्मविश्वासाने गर्भधारणा पुढे सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. स्त्रीरोगतज्ज्ञांच्या नियमित देखरेखीखाली आणि वेळोवेळी आवश्यक तपासण्या करून गर्भधारणा ३५ आठवड्यांपर्यंत यशस्वीरीत्या सांभाळण्यात आली.

आई आणि तिन्ही बाळांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ३५ आठवड्यांनंतर सिझेरियन शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. तृप्ती पाटील-दरंदले आणि डॉ. मुथा यांनी ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली. भूलतज्ज्ञ म्हणून डॉ. वैष्णवी आणि डॉ. क्षीरसागर, तसेच बालरोगतज्ज्ञ आणि परिचारिका पथकाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

या शस्त्रक्रियेद्वारे दोन मुली आणि एका मुलाचा जन्म झाला. त्यांचे वजन अनुक्रमे २.२ किलो, २ किलो आणि १.९ किलो होते. विशेष म्हणजे, आई आणि तिन्ही बाळांची प्रकृती उत्तम असून प्रसूतीनंतर दुसऱ्याच दिवशी (POD 3) त्यांना रुग्णालयातून सुखरूप घरी सोडण्यात आले.

यावेळी डॉ. तृप्ती पाटील यांनी सांगितले की, कृत्रिम गर्भधारणा तंत्रज्ञानामुळे (Assisted Reproductive Techniques) तिळ्यांची गर्भधारणा होण्याचे प्रमाण तुलनेने अधिक असते; मात्र नैसर्गिक गर्भधारणेतून तीन बाळांचा जन्म होणे ही अत्यंत दुर्मिळ घटना असून साधारणत ८,००० प्रसूतींमागे अशी एक घटना आढळते.

अशा गुंतागुंतीच्या गर्भधारणेमध्ये स्त्रीरोगतज्ज्ञांकडून नियमित आणि काटेकोर निरीक्षण, योग्य वेळी प्रसूतीचा निर्णय तसेच अनुभवी स्त्रीरोगतज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ आणि प्रशिक्षित परिचारिका पथक यांच्यातील समन्वय अत्यंत महत्त्वाचा असतो. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे आई आणि तिन्ही नवजात बालकांची सुखरूप प्रसूती शक्य झाली.

अशा प्रकारच्या गुंतागुंतीच्या आणि उच्च जोखमीच्या प्रसूतींसाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल मध्ये १८ खाटांचे अत्याधुनिक व सर्व सुविधांनी सुसज्ज नवजात शिशू अतिदक्षता विभाग उपलब्ध आहे. या विभागात प्रशिक्षित आणि अनुभवी वैद्यकीय व परिचारिका पथक कार्यरत असून, डॉ. गुट्टे, डॉ. दीपी अग्रवाल आणि डॉ. वैभवी वंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली नवजात बालकांची विशेष काळजी घेतली जाते. अशा सक्षम NICU सुविधे मुळे अकाली जन्मलेल्या किंवा विशेष वैद्यकीय निगा आवश्यक असलेल्या नवजात बालकांना तातडीने आणि दर्जेदार उपचार उपलब्ध करून देणे शक्य होते.

आनंदऋषीजी हॉस्पिटलने आरोग्यसेवेचे कामधेनू म्हणून नावलौकिक मिळविला

वसंत लोढा यांचे प्रतिपादन



जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे मोफत कॅन्सर तपासणी व सवलतीच्या दरात उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी वसंत लोढा आदी.

कॅन्सर तपासणी शिबिरात १२५ रुग्णांची मोफत तपासणी; गरजूंना अल्पदरात शस्त्रक्रिया व कॅन्सर उपचारांवर विशेष सवलत

नगर – निस्वार्थ आरोग्यसेवेच्या माध्यमातून श्री आनंदऋषीजी हॉस्पिटलने आरोग्यसेवेचे कामधेनू म्हणून नावलौकिक मिळविला आहे. या सेवाकार्यात लोढा परिवाराला योगदान देता येत असल्याचा आनंद आणि समाधान आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासाठी आरोग्यसेवेचे महत्त्वपूर्ण केंद्र बनलेल्या या हॉस्पिटलचा विस्तार आता इतर जिल्ह्यांमध्येही होत आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतून रुग्ण येथे उपचारासाठी येत असून, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या आरोग्यसेवेची महती देशभर पोहोचत आहे, असे प्रतिपादन वसंत लोढा यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे मोफत कॅन्सर तपासणी व सवलतीच्या दरात उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी वसंत लोढा बोलत होते. विशेष म्हणजे, या शिबिराचे उद्घाटन अनामप्रेम संस्थेतील अंध मुला-मुलींच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी अनामप्रेम संस्थेतील मुला-मुलींनी आनंदऋषीजी महाराज यांच्या जीवनावर आधारित गीत सादर करून त्यांना अभिवादन केले. तसेच आईवरील भावस्पर्शी गीत सादर करून स्व. मानकुंवरबाई यांना आदरांजली वाहण्यात आली. अंध मुला-मुलींनी सादर केलेल्या गीतांनी उपस्थितांचे मन हेलावून गेले. या भावनिक सादरीकरणामुळे अनेकांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. यावेळी लोढा परिवाराच्या वतीने अनामप्रेम संस्थेला आर्थिक मदतही देण्यात आली.

या उद्घाटन सोहळ्याला पारस लोढा, पोपट लोढा, सौ. लता लोढा, उषा लोढा, मीना लोढा, श्री विशाल गणपती देवस्थानचे अध्यक्ष ड. अभय आगरकर, अशोक कानडे यांच्यासह लोढा परिवारातील सदस्य व मित्रमंडळी उपस्थित होते. तसेच संतोष बोथरा, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. वसंत कटारिया यांच्यासह जैन सोशल फेडरेशनचे सदस्य, अनामप्रेम संस्थेचे अजित माने, कॅन्सर सर्जन डॉ. अनिकेत शिंदे, डॉ. तुषार मुळे, डॉ. रविंद्र मुथा, डॉ. तृप्ती पाटील आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, लोढा परिवाराने सामाजिक सेवेचे व्रत स्वीकारले असून, पिढ्यानपिढ्या त्यांचे सामाजिक कार्य सुरू आहे. समाजसेवेला आपल्या कार्याचा कणा मानून हा परिवार विविध उपक्रमांमध्ये योगदान देत आहे. आईच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त लोढा परिवाराने जैन सोशल फेडरेशनच्या महावीर युनिव्हर्सिटीला मोठी देणगी दिली होती. याशिवाय अनेक मोठ्या सामाजिक प्रकल्पांमध्येही परिवाराचा हातभार लागला आहे. आईचा स्मृतिदिन सामाजिक कार्याच्या माध्यमातून साजरा करण्याचा हा उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविणे हॉस्पिटलचे मुख्य उद्देश आहे. या कार्यामागे पैसा कमावणे हा उद्देश नसून, आनंदऋषीजी हॉस्पिटलने समाजाचा विश्वास संपादन केला आहे, असेही त्यांनी नमूद केले.

कॅन्सर सर्जन डॉ. अनिकेत शिंदे यांनी सांगितले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये सर्व प्रकारच्या कॅन्सरवरील शस्त्रक्रिया केल्या जातात. त्याचबरोबर केमोथेरपीची सुविधाही उपलब्ध आहे. तंबाखू, सिगारेट यांसारख्या व्यसनांमुळे कॅन्सरचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे नागरिकांनी अशा व्यसनांपासून दूर राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. प्रकाश कांकरिया म्हणाले की, लोढा परिवार समाजाशी घट्ट जोडलेला आहे. सौ. लता लोढा नगराध्यक्षा असताना आनंदऋषीजी हॉस्पिटलची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. हॉस्पिटलच्या उभारणीपासूनच लोढा परिवार या आरोग्य मंदिराशी जोडला गेला असून, आरोग्यसेवेच्या कार्यात त्यांचे सातत्याने योगदान राहिले आहे.

ॲड. अभय आगरकर म्हणाले की, स्व. मानकुंवरबाई लोढा यांनी आपल्या मुलांवर सामाजिक सेवेचे संस्कार घडविले. आई-वडिलांकडून मिळालेला सामाजिक कार्याचा वारसा तिन्ही बंधू पुढे घेऊन जात आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटलचा प्रवास समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याच्या दिशेने सुरू आहे. दानशूर व्यक्ती आणि परिवार जेव्हा सामाजिक कार्यासाठी पुढे येतात, तेव्हाच असे मोठे समाजोपयोगी प्रकल्प उभे राहू शकतात, असे त्यांनी सांगितले.

या शिबिरात एकूण १२५ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर गरजेनुसार रुग्णांवर अल्पदरात शस्त्रक्रिया करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच विविध प्रकारच्या थेरपी आणि कॅन्सर उपचारांवर विशेष सवलत देण्यात आली आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.

मर्चंटस बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नितीन भंडारी यांची निवड



मर्चंटस को ऑप बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नितीन भंडारी यांची निवड झाली आहे. या निवडीबद्दल मुंबई येथे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी भंडारी यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

नगर – अहमदनगर मर्चंटस को ऑप बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नितीन भंडारी यांची निवड झाली आहे. या निवडीबद्दल मुंबई येथे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी भंडारी यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी बँकेचे चेअरमन संजय चोपडा उपस्थित होते.

मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, सुवर्ण महोत्सवी टप्पा ओलांडणारी अहमदनगर मर्चंटस बँक राज्यातील आदर्शवत सहकारी बँक म्हणून ओळखली जाते. संस्थापक हस्तीमल मुनोत यांच्या सारखे दूरदृष्टीचे नेतृत्व बँकेला लाभले आहे. त्यांच्यासह सर्व संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी अतिशय समर्पित भावनेने काम करत असतात. सभासदांचा दृढ विश्वास आणि शिस्तबद्ध कारभार या बँकेचे वैशिष्ट्य आहे. आधुनिक स्पर्धेच्या युगात बँकेने सर्व प्रकारच्या डिजिटल बँकिंग सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. भंडारी यांच्या सारख्या अनुभवी अधिकाऱ्यांचा बँकेला कामकाज करताना निश्चितच लाभ होईल.

चेअरमन संजय चोपडा म्हणाले, मर्चंटस बँकेने सुवर्ण वर्षानिमित्त सभासदांना ५१०० रूपयांची ठेव पावती देण्याचा निर्णय घेतला. या प्रस्तावास आवश्यक परवानग्या मिळवून देण्यासाठी मंत्री जयकुमार गोरे, आमदार संग्राम जगताप, अनुप काळे यांनी मोलाचे सहकार्य केले. नूतन सीईओ नितीन भंडारी हे स्थापनेपासून बँकेत कार्यरत आहेत. संस्थापक चेअरमन हस्तीमल मुनोत मार्गदर्शनाखाली काम करण्याचा मोठा अनुभव त्यांच्याकडे आहे. त्यांनी अनेक वर्षे जॉइंट सीईओ म्हणून कामकाज पाहिले आहे. सहकार बँकिगचा त्यांना मोठा अभ्यास आहे. आता मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणूनही ते ठसा उमटवणारे काम करतील असा विश्वास चोपडा यांनी व्यक्त केला.

या निवडीबद्दल नितीन भंडारी यांचे आमदार संग्राम जगताप, बँकेचे संस्थापक चेअरमन व विद्यमान ज्येष्ठ संचालक हस्तीमल मुनोत, माजी उपमहापौर गणेश भोसले, मनपाचे गटनेते नगरसेवक प्रकाश भागानगरे, नफीस चुडीवाला, रवींद्र सेलोत, संतोष ताथेड, मिलिंद कुलकर्णी, संतोष गुगळे, आप्पा नगरकर व संचालक मंडळाने अभिनंदन केले आहे.



महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालयाकडून आयोजित शासकीय बालचित्रकला स्पर्धेत गुरुकुल कॅम्पसमधील डॉ.पी.ए. इनामदार प्राथमिक विद्यालयाची इयत्ता तिसरीतील विद्यार्थिनी लावण्या अण्णासाहेब बाचकर हिने जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविताना तिला २००० रुपयांचा धनादेश शासनाकडून प्राप्त झाला आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष एन.ए.पठाण, शाला समिती चेअरमन अनिल साळुंके, सचिव समीर पठाण, शाला समिती सदस्य गणेश गरड, देविदास डहाळे,वीणा येले, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कुंदा झोंड, कला शिक्षिका योगिता मोहिते, वर्गशिक्षिका शिल्पा शिंदे आदींनी शुभेच्छा देत तिचे अभिनंदन केले.

स्नेहबंध फौंडेशनच्यावतीने जिल्हास्तरीय किल्ले बनवा स्पर्धा



नगर – स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने जिल्हास्तरीय किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी दिली.

दिवाळीत लहान मुले एकत्र येऊन विविध किल्ले साकारतात. लहान मुलांच्या कल्पकतेला वाव देणाऱ्या आणि आपल्या इतिहासाबद्दल जागरुकता निर्माण करणाऱ्या या उपक्रमाला चालना देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यांना या स्पर्धेत सहभाग घ्यावयाचा आहे, त्यांनी आपले पूर्ण नाव, पत्ता व मोबाईल नंबरसह ११ नोव्हेंबर पर्यंत ८७९३ १९१९१९ या क्रमांकावर मोबाईलवर काढलेला अर्ध्या मिनिटाचा व्हीडिओ व ३ ते ४ फोटो पाठवावे.(जुना व्हिडिओ व फोटो चालणार नाही.) किल्ला दगडमातीचा असावा, पण सजावटीकरता अन्य वस्तू व रंग वापरता येतील. इकोफ्रेंडली किल्ला असल्यास त्यालाही विशेष गुण दिले जाणार आहेत. डॉ. उद्धव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली समिती परीक्षण करून पहिल्या तीन स्पर्धकांना दिवाळी झाल्यानंतर गौरवण्यात येणार आहे. मागील विजेत्या स्पर्धकांना प्रवेश मिळणार नाही. स्पर्धेत प्रवेश मोफत आहे.

आय.एम.एस.सी.डी.आर.मध्ये राष्ट्रीय एकता दिवस साजरा



नगर – बी.पी. हिवाळे एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च), अहिल्यानगर (आय.एम.एस.सी.डी.आर.) येथे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा आणि जबाबदार नागरिकत्वाची मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाची सुरुवात भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. हातिम कय्यूमी आणि ग्रंथपाल डॉ. स्वाती बार्नबस यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली.

यानंतर विद्यार्थ्यांनी, प्राध्यापकांनी आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्याची शपथ घेतली. प्रा. तृप्ती कोठारी यांनी इंग्रजी भाषेत, तर प्रा. अजित कुटे यांनी हिंदी भाषेत राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रतिज्ञेचे वाचन केले. विविधतेचा आदर, प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व या निमित्ताने अधोरेखित करण्यात आले.

या दिनाचे औचित्य साधून आय.एम.एस.च्या ग्रंथालयातर्फे वल्लभभाई पटेल यांच्या जीवनकार्यावर आधारित पुस्तकांच्या मुखपृष्ठांचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आल होते. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना त्यांचे नेतृत्व, संस्थानांच्या विलीनीकरणातील ऐतिहासिक भूमिका आणि भारताच्या एकात्मतेसाठी त्यांनी दिलेले योगदान जाणून घेण्याची संधी मिळाली. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार वाचन आणि अभ्यासाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमामागील हेतू होता.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रंथालय विद्यार्थी समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी रेवती माळशे आणि ऐश्वर्या राऊत यांनी केले. छायाचित्रण व व्हिडिओ चित्रीकरणाची जबाबदारी वैभवी कदम, श्रुती सागर, साक्षी शितोळे, मसिरा सय्यद आणि मुस्कान सय्यद यांनी पार पाडली. मंच व्यवस्थापन दीपिका गोरे, साक्षी म्हागडे आणि सानिया शेख यांनी, तर सभास्थळावरील व्यवस्था ग्रंथालय कर्मचारी धनराज घोडके, राजेश कांबळे आणि संदेश पाटोळे, मुकेश बहोत आणि विद्यार्थि मल्हार रहिंज यांनी सांभाळली. या उपक्रमाला प्रा. गौरी पाटील, प्रा. श्रुती राव आणि प्रा. सायली तोरणे यांचे सहकार्य लाभले.

या प्रसंगी संस्थेच्या प्रभारी संचालिका डॉ. प्रणोती तेलोरे आणि उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांनी विद्यार्थी समिती तसेच आयोजकांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. कार्यालय अधीक्षक महेश दीक्षित, लेखापाल नरेंद्र कदम, ग्रंथालय कर्मचारी जितिन आढाव, सिराज मुलाणी, , विजय पाटोळे, तसेच विविध अभ्यासक्रमांचे विद्यार्थी उपस्थित होते. एक भारत, श्रेष्ठ भारत या संकल्पनेला अधोरेखित करणाऱ्या या उपक्रमातून राष्ट्रीय एकात्मता, परस्पर आदर आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचे स्मरण करत एकता, अखंडता आणि जबाबदार नागरिकत्वाची मूल्ये जपण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेचा वधू-वर मेळावा राज्यासाठी आदर्श : आ. योगेश टिळेकर

राज्यभरातून ६०० इच्छुकांनी केली नोंद



अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या वतीने माळी समाज वधू-वर परिचय मेळावा बंधन लॉन्स, सावेडी येथे पार पडला. या मेळाव्याच्या उद्घाटन सोहळ्यास उपस्थित अतिथी व समाज बांधव.

नगर – लग्न जमविणे हा समाजात मोठा ज्वलंत प्रश्न निर्माण झाला आहे. माळी समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी वधू-वर मेळाव्याचे नियोजन करून अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेने समाजाच्या व्यवस्थेसाठी पुढाकार घेतला आहे. या वधू-वर मेळाव्याला जिल्ह्यातून प्रतिसाद मिळाला आहे. याबरोबरच छत्रपती संभाजीनगर, पुणे, नाशिक, विदर्भ, सातारा, पनवेल, मुंबई, मराठवाडा येथील समाजबांधव मोठ्या संख्येने आल्याने या मेळाव्याला जिल्हास्तरीय जरी म्हटले असले तरी हा मेळावा राज्यासाठी एक आदर्श मेळावा ठरला आहे, असे प्रतिपादन भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष आ. योगेश टिळेकर यांनी केले.

अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या वतीने माळी समाज वधू-वर परिचय मेळावा बंधन लॉन्स, सावेडी येथे पार पडला. या मेळाव्याचा उद्घाटन सोहळा आ. टिळेकर यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आ. संग्राम जगताप, कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आ. पांडुरंग अभंग, स्वागताध्यक्ष उपमहापौर धनंजय जाधव, संस्थेचे अध्यक्ष किशोर डागवाले, आयोजक उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, कर्जतचे प्रथम नगराध्यक्ष नामदेव राऊत राहाताचे नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर, श्रीगोंद्याच्या नगराध्यक्षा सुनिता खेतमाळीस, अर्जुनराव बोरुडे, जि.प. सदस्य शरद झोडगे, महेश झोडगे, अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेचे विश्वस्त भगवान फुलसौंदर, संतोष म्हस्के, संजय गारुडकर, प्रा.माणिक विधाते, सचिव अमोल भांबरकर, खजिनदार विनोद पुंड, अनिल इवळे, डॉ. रणजीत सत्रे, उद्योजक राजेंद्र ताठे, विजयकुमार बोरुडे, कैलास गाडीलकर, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, माजी पंचायत समिती सभापती खंडु भुकन, किसनराव रासकर, विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त ज्ञानेश्वर रासकर, अंबादास गारुडकर, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष भूषण भुजबळ, नगरसेवक आशाताई डागवाले, सुजाता पडोळे, वंदनाताई ताठे, माजी नगरसेविका सुप्रियाताई जाधव, अनिता देवतकर, प्रयागाताई लोंढे आदी उपस्थित होते.

प्रत्येक माणूस समाजाला जोडला जावा

आ. जगताप म्हणाले, समाजाचा प्रत्येक माणूस समाजाला जोडला गेला पाहिजे,या उद्देशाने समाजाच्या अडचणी व समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेचे अध्यक्ष किशोर डागवाले व बाळासाहेब भुजबळ संघटनेच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याचे काम करीत आहेत. या मेळाव्यातून अनेक विवाह जुळतील. हा मेळावा अहिल्यानगरच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला जाईल.

समाजात एकोपा निर्माण होता

उपमहापौर जाधव म्हणाले, वधू-वर मेळाव्यातून समाजात एकोपा निर्माण होतो. समाजाने उत्कृष्ट पद्धतीने नियोजन केल्याने वधू-वर मेळावा यशस्वी झाला आहे. समाज हितासाठी वधू-वर मेळावा घेणे ही काळाची गरज आहे.यापुढील काळातही वधू-वर मेळावा घेण्यात येईल.

सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करणार

प्रास्ताविकात किशोर डागवाले म्हणाले, या वधू-वर मेळाव्याला जिल्ह्यासोबतच राज्यातून मोठा प्रतिसाद मिळाला आहे. गेल्या तीन वर्षांपासून अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या वतीने वधू-वर नोंदणी कार्यालयाची सुरुवात करण्यात आली होती. सध्याच्या काळात लग्न जमविणे हा मोठा समाजाचा प्रश्न सोडविण्यासाठी अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेने प्रत्येक तालुक्यात संपर्क करून वधू-वर मेळावा यशस्वी करण्यासाठी जो प्रयत्न केला आहे तो यशस्वी झाला आहे. प्रथमच वधू-वर मेळाव्याला मोठा प्रतिसाद मिळाल्याने या मेळाव्यात जी लग्ने जमतील त्यांच्यासाठी सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात येईल,अशी ग्वाही त्यांनी दिली.

राज्यभरातून मिळाला प्रतिसाद

आयोजक बाळासाहेब भुजबळ म्हणाले, सांगण्यास आनंद होत आहे की या मेळाव्याला जो प्रतिसाद मिळाला आहे तो न भूतो न भविष्यती आहे. या मेळाव्याला जिल्हास्तरीय स्वरूप जरी म्हटले असले तरी राज्यातून मोठ्या प्रमाणात वधू-वर उपस्थित आहेत. या वधू-वर मेळाव्यात ६०० बायोडाटा परिचय पत्रांची नोंदणी करण्यात आली. हा मेळावा यशस्वी होण्यासाठी अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेचे सर्व पदाधिकारी, विश्वस्त व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले आहेत.

मेळाव्यासाठी यांनी घेतले परिश्रम

मेळावा यशस्वी करण्यासाठी वधू-वर सूचक मंडळाचे अध्यक्ष राजाराम चिपाडे, उपाध्यक्ष संजय ताजणे, खजिनदार रमेश चिपाडे, सचिव सुदाम बोरुडे, विश्वस्त अशोक हिंगे, सुभाष गोंधळे, दत्तात्रय शिंदे, मच्छिंद्र बनकर, भास्कर चौधरी, चंद्रकांत पुंड, कॅप्टन सुधीर पुंड, रामदास फुले, भानुदास बनकर, निलेश चिपाडे, सुधाकर कानडे, संजय कानडे, मनोज भुजबळ, राहुल रासकर, प्रकाश शिंदे, एकनाथ व्यवहारे, प्रकाश इवळे, सुरेखा घोलप, रेणुकाताई पुंड, सुषमा पडोळे, विजया भांबरकर, शितल भुजबळ आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन चेतन गायकवाड, सुनील राऊत, रोहिणी बनकर यांनी केले. सचिव अमोल भांबरकर यांनी आभार मानले.

अर्थजगत



पतीच्या निधनानंतर आर्थिक घडी कशी सावरावी?

कुटुंबातील कमावत्या व्यक्तीचे निधन झाल्यानंतर घरातील आर्थिक व्यवहारांची जबाबदारी अनेकदा पत्नीवर येते. पतीच्या निधनाचे दुःख पचवत असतानाच बँक खाती, विमा, गुंतवणूक, मालमत्ता आणि कर्ज यांची माहिती मिळविण्याची धावपळ सुरू होते. घरखर्च, मुलांचे शिक्षण आणि कर्जाचे हप्ते सुरूच असतात. आर्थिक व्यवहारांची पुरेशी माहिती नसल्यास अशा परिस्थितीत अडचणी आणखी वाढतात. त्यामुळे महिलांनी कुटुंबाच्या आर्थिक नियोजनात सुरुवातीपासून सहभागी होणे आवश्यक आहे.

इक्विरस वेल्थच्या 'शक्ती अँड कॅपिटल' या अभ्यासानुसार, सर्वेक्षणातील ४० टक्के महिलांनी पतीचे निधन, विभक्त होणे, आर्थिक नुकसान किंवा वारसाहक्काने मालमत्ता मिळणे अशा परिस्थितींनंतर कुटुंबाची आर्थिक जबाबदारी स्वीकारली. आर्थिक व्यवहारांची माहिती वेळेवर उपलब्ध असण्याचे महत्त्व यातून स्पष्ट होते.

■ **सर्व आर्थिक व्यवहारांची माहिती मिळवा :** सर्वप्रथम कुटुंबाच्या मालकीची मालमत्ता, उपलब्ध रोख रक्कम आणि थकीत कर्ज यांची माहिती गोळा करावी. बँक खाती, मुदतठेवी, म्युच्युअल फंड, शेअर्स, भविष्यनिर्वाह निधी, विमा पॉलिसी आणि स्थावर मालमत्ता यांची स्वतंत्र यादी तयार करावी. बँक स्टेटमेंट, ईमेल, डीमॅट खात्याचे विवरण आणि प्राप्तिकराशी संबंधित कागदपत्रांमधून आवश्यक माहिती मिळू शकते. पतीचे करसल्लागार, विमा प्रतिनिधी किंवा आर्थिक सल्लागार यांच्याकडेही काही नोंदी उपलब्ध असू शकतात.

गुंतवणुकीची माहिती मिळाली म्हणजे संबंधित रक्कम लगेच हाती येईल, असे नाही. केवायसीमधील त्रुटी, नावातील फरक किंवा आवश्यक कागदपत्रांचा अभाव यामुळे दावे रखडू शकतात. त्यामुळे महिलेच्या स्वतःच्या बँक खात्यात काही रक्कम उपलब्ध असणे उपयोगाचे ठरते.

■ **नॉमिनी म्हणजे मालमत्तेचा मालक?:** बँक खाते किंवा गुंतवणुकीत नॉमिनी म्हणून नाव असल्यामुळे संपूर्ण मालमत्तेचा मालकीहक्क आपोआप मिळतो, असे प्रत्येक बाबतीत होत नाही. मालमत्तेचा प्रकार आणि लागू कायद्यानुसार अंतिम हक्क निश्चित होतात.

उदाहरणार्थ, एखाद्या हिंदू पुरुषाचे वैध मृत्युपत्र नसताना निधन झाले आणि त्याच्या पश्चात पत्नी, आई व दोन मुले एवढेच प्रथम श्रेणीतील वारस असतील, तर त्याच्या स्वतंत्र मालकीच्या मालमत्तेत प्रत्येकाला एक चतुर्थांश हिस्सा मिळू शकतो. संयुक्त किंवा वडिलोपार्जित मालमत्तेबाबत परिस्थिती वेगळी असू शकते.

■ **कर्जाची जबाबदारी समजून घ्या :** पतीच्या वैयक्तिक कर्जासाठी पत्नी केवळ विवाहामुळे जबाबदार ठरत नाही. मात्र ती सहकर्जदार किंवा जामीनदार असल्यास जबाबदारी निर्माण होऊ शकते. कर्जदात्यांना मृत व्यक्तीच्या मालमत्तेतून कायदेशीररीत्या वसुली करण्याचा अधिकार असू शकतो.

विमा किंवा वारसाहक्कातून मिळालेली संपूर्ण रक्कम लगेच गुंतवण्याची घाई करू नये. प्रथम तीन ते सहा महिन्यांचा आवश्यक घरखर्च उपलब्ध ठेवण्याचा विचार करावा. त्यानंतर मुलांचे शिक्षण, कर्ज, नियमित उत्पन्न आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन आर्थिक नियोजन करावे.

कुटुंबातील आर्थिक माहिती दोन्ही जोडीदारांना असणे, नामनिर्देशन अद्ययावत ठेवणे आणि योग्य मृत्युपत्र तयार करणे ही भविष्यातील आर्थिक सुरक्षिततेची महत्त्वाची तयारी ठरते. ◆◆◆

प्राप्तिकर विवरणपत्रासाठी वर्षभराची तयारी ठेवा

प्राप्तिकर विवरणपत्र भरण्याची अंतिम मुदत जवळ आली की अनेक करदात्यांची कागदपत्रे शोधण्याची धावपळ सुरू होते. कधी फॉर्म १६ मिळत नाही, तर कधी बँकेचे व्याज, म्युच्युअल फंडातील व्यवहार किंवा विम्याच्या हप्त्यांच्या पावत्या शोधाव्या लागतात. घाईघाईत विवरणपत्र भरताना उत्पन्नाची एखादी बाब राहून जाणे किंवा चुकीची माहिती नोंदवली जाण्याची शक्यता असते. वर्षभर आर्थिक कागदपत्रांची व्यवस्थित नोंद ठेवल्यास या अडचणी टाळता येतात.

प्राप्तिकरासाठी स्वतंत्र नोंदवही किंवा डिजिटल फोल्डर तयार करणे हा त्यासाठी सोपा उपाय आहे. त्यामध्ये उत्पन्न, बचत, गुंतवणूक, खर्च आणि करभरणा यांची माहिती विभागवार ठेवता येते.

■ **कोणती कागदपत्रे जतन करावीत? :** नोकरदारांनी मासिक वेतनपत्रके, फॉर्म १६ आणि इतर उत्पन्नाची कागदपत्रे जतन करावीत. घरभाड्यातून उत्पन्न मिळत असल्यास त्याचा तपशील, बँक ठेवींवरील व्याज, लाभांश आणि इतर प्राप्ती यांची नोंद ठेवावी. म्युच्युअल फंड, शेअर्स, विमा, गृहकर्ज आणि इतर गुंतवणुकीची कागदपत्रे स्वतंत्र ठेवावीत. गुंतवणूक विक्रीतून झालेला नफा किंवा तोटा याची माहितीही महत्त्वाची असते. करकपातीच्या नोंदी तपासण्यासाठी फॉर्म २६एएस आणि वार्षिक माहिती विवरणपत्र अर्थात एआयएस उपयोगी पडते. करसवलतीसाठी आवश्यक पावत्या जतन करताना संबंधित आर्थिक वर्षात कोणती करप्रणाली निवडली आहे, याचाही विचार करावा. जुन्या आणि नव्या करप्रणालीतील सवलतींचे नियम वेगळे आहेत.

■ **डिजिटल नोंदींचा उपयोग :** संगणकावर आर्थिक वर्षानुसार स्वतंत्र फोल्डर करावेत. त्यामध्ये वेतन, बँक, गुंतवणूक, विमा आणि करभरणा असे उपविभाग ठेवता येतील. महत्त्वाच्या कागदपत्रांच्या पीडीएफ प्रती सुरक्षित ठेवाव्यात. एक्सेलमध्ये उत्पन्न, गुंतवणूक, करकपातीची साधी नोंद ठेवली, तरी वर्षअखेरीस हिशेब करणे सोपे जाते. मात्र प्राप्तिकर पोर्टलचा पासवर्ड किंवा गोपनीय माहिती सर्वसाधारण फाइलमध्ये ठेवू नये.

■ **दर तीन महिन्यांनी आढावा :** प्रत्येक महिन्याला नोंदी तपासणे शक्य नसल्यास किमान तीन महिन्यांनी त्यांचा आढावा घ्यावा. यामुळे बँकेतील व्याज, शेअर व्यवहार किंवा इतर उत्पन्नाची नोंद राहिलेली नाही ना, हे तपासता येते. जुनी विवरणपत्रे आणि संबंधित पुरावेही सुरक्षित ठेवावेत. विशेषतः मोठे आर्थिक व्यवहार, परदेशातील उत्पन्न किंवा मालमत्ता आणि करसंबंधी प्रलंबित प्रकरणे असल्यास संबंधित कायदेशीर तरतुदींनुसार नोंदी जतन करणे आवश्यक ठरू शकते.

■ **आधी भरलेली माहिती तपासा :** प्राप्तिकर पोर्टलवर काही माहिती आपोआप भरलेली दिसते. मात्र ती अचूक आहे, असे गृहीत धरू नये. बँक स्टेटमेंट, फॉर्म १६, एआयएस आणि स्वतःच्या नोंदी यांची तुलना करावी. योग्य विवरणपत्राचा प्रकार, निर्धारण वर्ष, करप्रणाली आणि उत्पन्नाचे सर्व स्रोत तपासल्यानंतरच विवरणपत्र सादर करावे. वर्षभर नोंदी अद्ययावत ठेवल्यास प्राप्तिकर विवरणपत्र भरणे अधिक सुलभ होते. ◆◆◆

पुढील पाच वर्षांत स्वतःची आर्थिक स्थिती कुठे पोहोचवायची, याचा विचार प्रत्येकाने करायला हवा. घरासाठी पैसे साठवणे, मुलांच्या शिक्षणाची तरतूद करणे, कर्ज कमी करणे किंवा निवृत्तीसाठी गुंतवणूक वाढवणे अशी उद्दिष्टे अनेकांची असतात. मात्र या उद्दिष्टांसाठी नेमकी किती रक्कम लागणार आणि ती कशी जमवायची, याचे नियोजन अनेकदा केले जात नाही. परिणामी नियमित उत्पन्न असूनही अपेक्षित बचत होत नाही.

पुढील पाच वर्षांत आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी...

■ अर्थ विशेष



पाच वर्षांचा आर्थिक आराखडा तयार करताना सुरुवात गुंतवणुकीच्या पर्यायांपासून करण्याऐवजी उत्पन्न आणि खर्चाच्या हिशेबापासून करावी.

■ **महिन्याला किती रक्कम शिल्लक राहते? :** समजा, एखाद्या व्यक्तीचे करानंतरचे मासिक उत्पन्न १ लाख रुपये आहे. त्यापैकी घरभाडे, कर्जाचे हप्ते, शाळेची फी, विमा आणि किराणा यांसाठी ६५ हजार रुपये खर्च होतात. प्रवास, खरेदी, मनोरंजन आणि इतर खर्च १० हजार रुपये आहेत. अशा परिस्थितीत दरमहा २५ हजार रुपये बचतीसाठी उपलब्ध होतात.

म्हणजेच उत्पन्नाच्या २५ टक्के रक्कम बाजूला ठेवता येते. मात्र प्रत्येक कुटुंबासाठी बचतीचे आदर्श प्रमाण एकसारखे नसते. उत्पन्नाची स्थिरता, कर्ज आणि जबाबदाऱ्या लक्षात घेऊन वास्तववादी बचत निश्चित करावी.

■ **उद्दिष्टांचे वर्गीकरण करा**

आर्थिक उद्दिष्टे तातडीची, मध्यमकालीन आणि दीर्घकालीन अशा तीन गटांत विभागावीत.

तातडीच्या उद्दिष्टांमध्ये आपत्कालीन निधी, आरोग्य विमा, मुदत विमा आणि जास्त व्याजाच्या कर्जाची परतफेड यांचा समावेश होतो. साधारण सहा महिन्यांच्या आवश्यक खर्चाइतका आपत्कालीन निधी ठेवण्याचा विचार करता येतो.

मध्यमकालीन उद्दिष्टांमध्ये वाहन खरेदी, घराच्या प्रारंभिक भरण्याची तयारी किंवा उच्च शिक्षणाचा खर्च असू शकतो. निवृत्ती आणि दीर्घकालीन संपत्तीवाढ ही स्वतंत्र उद्दिष्टे ठेवावीत.

■ **योग्य कालावधीसाठी योग्य गुंतवणूक :** दोन-तीन वर्षांत लागणारी रक्कम जास्त जोखमीच्या शेअर गुंतवणुकीत ठेवणे टाळावे. अल्पकालीन उद्दिष्टांसाठी बचत खाते, मुदतठेवी किंवा योग्य कमी जोखमीचे पर्याय विचारात घेता येतात. दीर्घकालीन उद्दिष्टांसाठी जोखीमक्षमता लक्षात घेऊन इक्विटी म्युच्युअल फंडांचा विचार करता येईल.

पगार जमा झाल्यानंतर ठरावीक रक्कम स्वयंचलित पद्धतीने बचत किंवा गुंतवणुकीकडे वळविल्यास सातत्य राखणे सोपे जाते.

■ **दरवर्षी नियोजन तपासा :** पगारवाढ, नोकरीतील बदल, कुटुंबातील वाढ किंवा अनपेक्षित खर्च यांमुळे आर्थिक परिस्थिती बदलू शकते. त्यामुळे वर्षातून एकदा उत्पन्न, खर्च, गुंतवणूक आणि उद्दिष्टांचा आढावा घ्यावा. पाच वर्षांत पैसा दुप्पट होईल, अशी हमी कोणत्याही आराखड्यात नसते. मात्र नियमित बचत, योग्य गुंतवणूक आणि खर्चावरील नियंत्रण यामुळे आर्थिक उद्दिष्टांच्या दिशेने सातत्याने प्रगती करता येते. ◆◆◆

महागाईचाही हिशेब आवश्यक

समजा, आज घराच्या प्रारंभिक भरण्यासाठी १० लाख रुपये लागणार आहेत. ही रक्कम चार वर्षांनी वापरायची असल्यास महागाईमुळे आवश्यक रक्कम वाढू शकते. वार्षिक ६ टक्के वाढ गृहीत धरल्यास चार वर्षांनी ती सुमारे १२.६२ लाख रुपये होईल. ही रक्कम चार वर्षांत जमवण्यासाठी कोणताही गुंतवणूक परतावा गृहीत न धरता दरमहा सुमारे २६,३०२ रुपये बाजूला ठेवावे लागतील. प्रत्यक्ष गुंतवणुकीचा परतावा, कर आणि खर्च यांनुसार आवश्यक मासिक रक्कम बदलू शकते.

घरखरेदी आणि भाड्यावरील टीडीएससाठी आता एकच फॉर्म!



घर किंवा जमीन खरेदी करताना, ठरावीक अटींनुसार भाडे देताना किंवा काही विशिष्ट आर्थिक व्यवहार करताना स्रोतावर करकपात म्हणजेच टीडीएसची जबाबदारी निर्माण होते. यासाठी पूर्वी वेगवेगळे फॉर्म वापरावे लागत होते. आता प्राप्तिकर अधिनियम, २०२५ अंतर्गत फॉर्म १४१ची व्यवस्था करण्यात आली आहे.

प्रत्येक व्यवहारासाठी स्वतंत्र माहिती

एखाद्या व्यक्तीने घरभाड्यावरील टीडीएस कापला आणि त्याच कालावधीत मालमत्ता खरेदीवरही टीडीएस कापला, तर दोन्ही व्यवहार एकाच फॉर्ममध्ये दाखवता येणार नाहीत. प्रत्येकासाठी संबंधित शेड्यूल निवडून स्वतंत्र विवरण सादर करावे लागेल.

एकाच प्रकारच्या अनेक देयकांची माहिती एकत्र नोंदवण्यासाठीही अटी आहेत. देयक स्वीकारणाऱ्यांची श्रेणी आणि टीडीएस कपातीचा महिना यांसारख्या बाबी महत्त्वाच्या ठरतात.

त्यामुळे संबंधित व्यवहारांवरील टीडीएस जमा करणे आणि त्याचा तपशील सादर करण्याची प्रक्रिया एकत्रित स्वरूपात उपलब्ध झाली आहे.

१ एप्रिल २०२६पासून लागू झालेल्या नव्या प्राप्तिकर व्यवस्थेत पूर्वीचे फॉर्म २६क्यूबी, २६क्यूसी, २६क्यूडी आणि २६क्यूई यांची जागा फॉर्म १४१ने घेतली आहे. मात्र सर्व प्रकारचे व्यवहार एकाच विवरणात नोंदवता येतात, असा याचा अर्थ नाही.

फॉर्म १४१मध्ये व्यवहाराच्या प्रकारानुसार पाच शेड्यूल आहेत. शेड्यूल ए हे पात्र व्यक्ती किंवा हिंदू अविभक्त कुटुंबाकडून दिल्या जाणाऱ्या भाड्यावरील टीडीएससाठी आहे. शेड्यूल बी स्थावर मालमत्तेच्या हस्तांतरणाशी संबंधित आहे. शेड्यूल सी ठेकेदार किंवा व्यावसायिकांना केलेल्या विशिष्ट देयकांवरील टीडीएससाठी आहे. शेड्यूल डी आभासी डिजिटल मालमत्तेच्या हस्तांतरणाशी संबंधित आहे.

शेड्यूल ई अनिवासी विक्रेत्याकडून स्थावर मालमत्ता खरेदी करणाऱ्या पात्र निवासी व्यक्ती किंवा हिंदू अविभक्त कुटुंबासाठी आहे. ही तरतूद १ ऑक्टोबर २०२६पासून लागू झाली. संबंधित पात्र व्यवहारासाठी स्वतंत्र टॅन घेण्याची आवश्यकता नाही. त्याऐवजी पॅनच्या साहाय्याने टीडीएस जमा करून व्यवहाराची माहिती देता येते.

■ **करकपातीची जबाबदारी कोणाची?**

मालमत्ता खरेदीच्या व्यवहारात कायद्यानुसार टीडीएस कापण्याची जबाबदारी साधारणपणे खरेदीदाराची असते. भाड्याच्या बाबतीत संबंधित अटी पूर्ण होत असल्यास भाडे देणाऱ्या व्यक्तीवर ही जबाबदारी येते.

टीडीएस कापणाऱ्या व्यक्तीला 'डिडक्टर', तर रक्कम प्राप्त करणाऱ्या व्यक्तीला 'डिडक्टी' म्हणतात. टीडीएसचा दर व्यवहाराचे स्वरूप, प्राप्तकर्त्याचा निवासी दर्जा आणि लागू कायदेशीर तरतुदींनुसार ठरतो.

फॉर्म भरताना घ्या काळजी

प्राप्तिकर विभागाच्या ई-फाइलिंग पोर्टलवर पॅनच्या साहाय्याने लॉगिन करून 'ई-पे टॅक्स' विभागातून फॉर्म १४१ निवडावा. त्यानंतर व्यवहाराचा तपशील, प्राप्तकर्ता, कापलेला टीडीएस आणि जमा केलेला कर यांची माहिती भरावी.

टीडीएस कपात झालेल्या महिन्याच्या समाप्तीनंतर एका महिन्याच्या आत संबंधित चालान-सह-विवरण सादर करणे आवश्यक आहे. कर जमा करण्यासाठीही निर्धारित मुदतीचे पालन करावे लागते.

फॉर्मची संख्या कमी झाली असली, तरी करकपातीची जबाबदारी कायम आहे. चुकीचा शेड्यूल, अपूर्ण माहिती किंवा विलंब यामुळे अडचणी निर्माण होऊ शकतात. ◆◆◆

दिवाळी आणि करांचे गणित

सणासुदीच्या काळात भेटवस्तू देणे आणि बोनस देणे हा आपल्या परंपरेचा एक भाग आहे. दिवाळीच्या निमित्ताने कंपन्या कर्मचाऱ्यांना भेटवस्तू, भेटवस्तूंची कुपन्स आणि बोनस देतात. त्याचप्रमाणे नातेवाईक आणि मित्रांकडूनही अनेकदा महागड्या भेटवस्तू मिळतात. मात्र, दिवाळीत मिळणाऱ्या या भेटवस्तूंवरही आयकर लागू होऊ शकतो, याची अनेकांना माहिती नसते. त्यामुळे आयकर विवरणपत्र भरताना चुका होण्याची शक्यता असते. परिणामी भविष्यात करासंबंधी अडचणी किंवा आयकर विभागाकडून नोटीस मिळू शकते. म्हणूनच कोणत्या भेटवस्तू करमुक्त आहेत आणि कोणत्या भेटवस्तूंवर कर भरावा लागू शकतो, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.



■ **१५ हजार रुपयांची मर्यादा**

करतज्ज्ञांच्या मते, आर्थिक वर्षात कंपनीकडून मिळालेल्या बिगररोख भेटवस्तूंची एकूण किंमत १५,००० रुपयांपेक्षा जास्त झाल्यास कराची गणना बदलू शकते. उदाहरणार्थ, एखाद्या कर्मचाऱ्याला वर्षभरात १२,००० रुपयांच्या भेटवस्तूंची कुपन्स मिळाली, तर ती रक्कम करमुक्त राहू शकते. मात्र, भेटवस्तूंची एकूण किंमत २०,००० रुपये झाल्यास संपूर्ण रक्कम वेतनात समाविष्ट करून कराची गणना केली जाऊ शकते. त्यामुळे केवळ दिवाळीत मिळालेल्या भेटवस्तूंचा विचार न करता संपूर्ण आर्थिक वर्षातील भेटवस्तूंचा हिशेब ठेवणे आवश्यक आहे. दिवाळीचा बोनस आणि भेटवस्तू यांमध्येही फरक आहे. रोख बोनस हा वेतनाचा भाग असल्याने त्यावर कर लागू होतो. बिगररोख भेटवस्तूंच्या बाबतीत मात्र ठरावीक मर्यादेपर्यंत करसवलत मिळू शकते.

नातेवाईक आणि मित्रांकडून मिळालेल्या भेटवस्तूंचे नियम

दिवाळीत कुटुंबीय, नातेवाईक आणि मित्रांकडून मिळणाऱ्या भेटवस्तूंवर कर लागू होणार की नाही, हे भेट देणारी व्यक्ती कोण आहे आणि भेटवस्तूची किंमत किती आहे, यावर ठरते. आई-वडील, पती-पत्नी, भाऊ-बहीण, मुले आणि सासू-सासरे यांसारख्या आयकर कायद्यात नमूद केलेल्या नातेवाईकांकडून मिळालेल्या रोख रकमेवर किंवा मालमत्तेच्या भेटीवर सामान्यतः कर लागत नाही. यासाठी रकमेची कमाल मर्यादा नाही. तसेच स्वतःच्या विवाहप्रसंगी मिळालेल्या भेटवस्तूही रकमेची मर्यादा न ठेवता करमुक्त असतात.

बोनसवर कधी लागतो कर?

दिवाळीला कंपनीकडून मिळणाऱ्या बोनस आणि भेटवस्तूंवर कर लागणार की नाही, हे त्यांचे स्वरूप काय आहे यावर अवलंबून असते. कंपनीने रोख बोनस दिला किंवा पैसे थेट बँक खात्यात जमा केले, तरी ती रक्कम कर्मचाऱ्याच्या वेतनाचा भाग मानली जाते. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्याच्या कराच्या टप्प्यानुसार त्या रकमेवर आयकर भरावा लागतो. यासाठी स्वतंत्र करसवलत मिळत नाही. दुसरीकडे, कंपनीने भेटवस्तू म्हणून उपकरणे, मिठाईचे डबे, कपडे, सणासुदीच्या भेटवस्तूंचे संच किंवा डिजिटल भेटवस्तूंची कुपन्स दिली, तर त्यांच्यासाठी वेगळे नियम लागू होतात. आर्थिक वर्षात अशा बिगररोख भेटवस्तूंची एकूण किंमत १५,००० रुपयांपर्यंत असल्यास करसवलत मिळू शकते. मात्र, ही मर्यादा केवळ दिवाळीच्या भेटवस्तूंसाठी नसून संपूर्ण आर्थिक वर्षात कंपनीकडून मिळालेल्या संबंधित भेटवस्तूंच्या एकूण किमतीसाठी लागू होते. ◆◆◆

शेअर बाजाराची भीती असल्यास गुंतवणुकीत समतोल कसा साधावा?

शेअर बाजारात मोठी घसरण झाली की अनेक गुंतवणूकदार अस्वस्थ होतात. काही जण घाईघाईने शेअर्स विकतात, तर काही बाजारापासून पूर्णपणे दूर राहण्याचा निर्णय घेतात. मात्र बाजारातील चढ-उतार टाळण्यासाठी संपूर्ण रक्कम बचत खात्यात ठेवणेही दीर्घकालीन आर्थिक नियोजनासाठी पुरेसे ठरत नाही. महागाईमुळे पैशाची क्रयशक्ती कमी होऊ शकते. त्यामुळे गुंतवणुकीत सुरक्षितता आणि वाढ यांचा समतोल साधणे महत्त्वाचे आहे.

वर्षातून एकदा फेरआढावा

समजा, एखाद्या गुंतवणूकदाराने ४० टक्के इक्विटी आणि ६० टक्के डेट असे प्रमाण निश्चित केले. बाजारातील तेजीमुळे इक्विटीचे प्रमाण ५० टक्क्यांवर पोहोचल्यास गुंतवणुकीचे पूर्वनिश्चित प्रमाण पुन्हा प्रस्थापित करण्याचा विचार करता येतो. मात्र त्यापूर्वी करपरिणाम, व्यवहारखर्च आणि आर्थिक उद्दिष्टांचा विचार करणे आवश्यक आहे.


गुंतवणूकदाराने सर्वप्रथम स्वतःची जोखीम स्वीकारण्याची क्षमता समजून घ्यावी. पैशाची गरज कधी भासणार आहे, यावर गुंतवणुकीचे स्वरूप ठरते. पुढील दोन-तीन वर्षांत आवश्यक असणारी रक्कम आणि निवृत्तीनंतर पंधरा वर्षांनी लागणारी रक्कम यांचे नियोजन सारखे असू शकत नाही.

स्थिरतेसाठी कोणते पर्याय? : कमी जोखीम स्वीकारणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी मुदतठेवी, सार्वजनिक भविष्यनिर्वाह निधी आणि योग्य दर्जाच्या कर्जरोखे आधारित गुंतवणूक योजना उपयोगी ठरू शकतात. मात्र प्रत्येक पर्यायाची तरलता, मुदत, करपरिणाम आणि जोखीम वेगळी असते.

मुदतठेवींवर ठरावीक व्याज मिळते. सार्वजनिक भविष्यनिर्वाह निधी दीर्घकालीन बचतीसाठी उपयुक्त असला, तरी त्यातून पैसे काढण्यावर नियम लागू होतात. डेट म्युच्युअल फंडांमध्ये व्याजदर आणि पतजोखीम असते. त्यामुळे त्यांना बँकेच्या मुदतठेवीप्रमाणे निश्चित परताव्याचा पर्याय समजू नये.

निर्देशांक निधीतून संपत्तीवाढ : दीर्घकालीन संपत्तीवाढीसाठी इक्विटीमधील काही गुंतवणूक उपयोगी ठरू शकते. निफ्टी ५० सारख्या निर्देशांकावर आधारित म्युच्युअल फंडातून अनेक मोठ्या कंपन्यांमध्ये एकाच वेळी गुंतवणूक होते.

अशा निधीमध्ये सक्रिय फंड व्यवस्थापकाच्या शेअर निवडीवर अवलंबून राहावे लागत नाही. मात्र बाजार घसरल्यास निर्देशांक निधीचे मूल्यही कमी होऊ शकते. त्यामुळे त्यात हमखास परतावा मिळतो, असा अर्थ काढू नये.



इक्विटी आणि डेट यांचा समतोल : स्वतः राखणे कठीण वाटत असल्यास बॅलन्स्ड ॲडव्हान्टेज फंडासारख्या पर्यायांचा अभ्यास करता येतो. अशा निधींमध्ये ठरवलेल्या गुंतवणूक धोरणानुसार मालमत्तेचे प्रमाण बदलले जाते. तरीही नुकसान होण्याची शक्यता कायम असते.

गुंतवणुकीचा दररोज आढावा घेण्याऐवजी ठरावीक कालावधीनंतर तपासणी करावी. आपत्कालीन निधी स्वतंत्र ठेवावा आणि आर्थिक परिस्थिती अनुकूल असल्यास नियमित एसआयपीद्वारे गुंतवणूक सुरू ठेवावी.

इतरांना मिळणाऱ्या मोठ्या परताव्याशी सतत तुलना केल्याने चुकीचे निर्णय होऊ शकतात. आपल्या आर्थिक गरजा, जोखीमक्षमता आणि कालमर्यादा यांना अनुरूप असलेला गुंतवणूक आराखडा अधिक उपयुक्त ठरतो. ◆◆◆

पीपल्स हेल्पलाईन, भारतीय जनसंसदेच्यावतीने सह्याद्रीच्या वनसंपदेसाठी भीमाशंकर सत्याग्रह आंदोलन



सह्याद्री पर्वतरांगांतील वनसंपदा, वन्यजीवांचे अधिवास आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्याबाबत महाराष्ट्र सरकारने संवेदनशील भूमिका घ्यावी, या मागणीसाठी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने भीमाशंकर सत्याग्रह आंदोलन करण्यात आले.

नगर – सह्याद्री पर्वतरांगांतील वनसंपदा, वन्यजीवांचे अधिवास आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्याबाबत महाराष्ट्र सरकारने संवेदनशील भूमिका घ्यावी, या मागणीसाठी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने भीमाशंकर सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. हुतात्मा स्मारक येथे करण्यात आलेल्या या आंदोलनात मंत्रिमंडळाच्या प्रतीकात्मक दगडांना शेंदूर लावून त्यावर गोमूत्र शिंपडण्यात आले. शासनाच्या कथित पर्यावरणविरोधी भूमिकेचा निषेध करत आंदोलकांनी मंत्रिमंडळाला जंगलमारी कॅबिनेट आणि दगडभेजा मंत्रिमंडळ जाहीर केले.

या आंदोलनात कारभारी गवळी, अशोक सब्बन, वीर बहादूर प्रजापती, दिगंबर साबळे, दत्तात्रय साबळे, अभिमान शिंदे, चतुरा शिंदे, पोपट भोसले, अशोक भोसले, बाबासाहेब भोसले, ज्ञानदेव चांदणे, राजू उमाप, सनी शिंदे, राहुल आढाव, आनंदा आढाव आदी सहभागी झाले होते.

कर्जत तालुक्यातील सायडोंगर परिसरात टोरंट पॉवर समूहाच्या प्रस्तावित प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होण्याची शक्यता असल्याने स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. या प्रकल्पासंदर्भात स्थानिकांचे आक्षेप आणि पर्यावरणीय प्रश्न पुरेशा गांभीर्याने विचारात घेतले जात नसल्याचा आरोप पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेने केला आहे. शासनाने घेतलेल्या निर्णयांची संपूर्ण माहिती जनतेसमोर पारदर्शकपणे मांडली जात नसल्याबद्दलही संघटनांनी नाराजी व्यक्त केली. सायडोंगर परिसरातील काही वृक्ष सुमारे ३०० वर्षे जुने असल्याचा संघटनांचा दावा आहे. त्यामुळे या वृक्षांचे वय, प्रजाती, जैवविविधतेतील स्थान आणि पर्यावरणीय महत्त्व यांची स्वतंत्र तज्ज्ञ समितीमार्फत शास्त्रीय तपासणी करून त्याचा अहवाल सार्वजनिक करावा, अशी मागणी करण्यात आली.

स्वतंत्र पर्यावरणीय फेरआढावा पूर्ण होईपर्यंत उर्वरित वृक्षतोड रोखावी, प्रकल्पासंबंधी सर्व मंजुऱ्या व कागदपत्रे सार्वजनिक करावीत, स्थानिक ग्रामस्थ आणि आदिवासींचे कायदेशीर हक्क अबाधित ठेवावेत तसेच वनसंपत्तीचे कमीत कमी नुकसान होईल असे पर्यायी मार्ग तपासावेत, अशा प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या.

यावेळी गवळी म्हणाले, मंत्रिमंडळाकडून देवपणाची अपेक्षा नाही; परंतु किमान माणुसकी, निसर्गाविषयी करुणा आणि संविधानाशी प्रामाणिकपणा तरी दाखवावा. सह्याद्रीची वनसंपदा आणि जैवविविधता वाचविण्यासाठी शासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अन्यथा महाराष्ट्रभर शांततापूर्ण आणि घटनात्मक मार्गाने भीमाशंकर सत्याग्रह अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.



गुरुवाणी – ९८
धर्म आणि संस्कृती

भगवान पार्श्वनाथ आणि भगवान महावीर दोघेही सर्वज्ञ असून दोघे एक का नाहीत? दोघांची व्यवस्था वेगवेगळी का आहे? अशी चर्चा सुरू होती. इंद्रभूती गौतम लाही हा प्रश्न पडला व त्याने यावर सविस्तर चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. इंद्रभूती गौतम व केशीकुमार श्रमण एकत्र आले. केशीकुमार श्रमणने आदरपूर्वक इंद्रभूती गौतमशी संवाद सुरू केला. मतभिन्नता असूनही चर्चा सुरू केली. केशीकुमार विचारतात, दोन्ही तीर्थंकरांचे लक्ष्य आहे, जगाचे कल्याण करायचे. मग दोघांनीही दोन वेगळे व्रत का दिले? एका आजारावर दोन वेगवेगळे औषध का? तेव्हा गौतम स्वामी उत्तर देतात, अंगात ताप आला तर लहान मुले, तरूण, वृद्ध यांना औषध सारखेच असले तरी त्याचे डोस वेगवेगळे असतात. दोन्ही तीर्थंकरांनी त्यांच्या प्रज्ञेनुसार तत्वांचे रहस्य समजून व्यवस्था केली आहे. भगवान महावीरांच्या काळात लोकांची मानसिकता बदलली. एखादी गोष्ट समजून सांगण्यासाठी वेगळे प्रयत्न करावे लागतात. यासाठीच दोन वेगवेगळ्या व्यवस्था केल्या आहेत. लक्ष्य आणि उद्देश दोघांचेही एकच आहे, त्यात बदल झालेला नाही. आजच्या काळातील जेन झीशी संवाद साधताना पद्धत बदलावीच लागते. पूर्वी दुकान चालवताना फक्त मालाच्या क्वालिटीला महत्व दिले जायचे. आता क्वालिटी सोबत आकर्षक पॅकेजिंग, मार्केटिंग, ब्रॅण्डिंगही आवश्यक बनले आहे. केशीकुमार गौतम स्वामींच्या उत्तराने समाधान व्यक्त करत आणखी एक प्रश्न विचारतात की, भगवान पार्श्वनाथ यांच्या काळात विशिष्ट ड्रेस कोड नव्हता. मग भगवान महावीरांच्या काळात श्वेत वस्त्र परंपरा का सुरू झाली? साधना आणि ड्रेस कोडचा काय संबंध? यावर गौतम स्वामी उत्तर देतात, यामागे विज्ञान आहे. ड्रेस कोड ही धर्माची साधना नाही तर धर्माचे साधन आहे. पूर्वी बिना साधन साधना केली जायची, पण आताच्या काळात साधन आवश्यक आहे. ड्रेस कोड ही ओळख असते. भगवान महावीरांनी सोशोलॉजी ओळखून ड्रेस कोडची व्यवस्था दिली. संस्कृती शिवाय धर्म टिकू शकत नाही हे विज्ञान आहे. साधना आणि संस्कृतीचे हे विज्ञान आहे. संस्कृती शिवाय समाज चालू शकत नाही. केशीकुमार श्रमणने यानंतर अनेक शाश्वत प्रश्न विचारले, जे आजच्या काळाशीही सुसंगत आहेत. आपण ज्या लोकांत राहतो, त्यांचा दबाव, प्रभाव आपल्यावर कायम असतो. हा दबाव कसा झुगारून लावायचा? इंद्रभूती गौतम सांगतात, तुम्ही स्वतःचे ध्येय एकदा निश्चित केले पाहिजे. मग इतर कोण काय करतय हे पाहू नका. तुमच्या ध्येयाच्या मार्गावरून हटू नका.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.



गुरुवाणी – ९९
श्रेष्ठत्वाचा शोध

जयघोष आणि विजयघोष काशी येथील ब्राह्मण पुत्र होते. एके दिवशी जयघोष नदीत स्नान करत असताना त्याला दिसते, एक बेडूक मासा गिळतो. त्याचवेळी एक साप येऊन बेडकाला गिळतो. पण बेडूक मासा सोडत नाही. इतक्यात आकाशातून एक गरूड येऊन सापाला तोंडात पकडतो. साप, बेडूक, मासा सगळे मरणाच्या दारात असुनही कोणी कोणाला सोडत नाही. जयघोष विचार करतो, संसारात असे कसे चालते? स्वतः मरणाच्या दारात असतानाही दुसऱ्याला मारणे सुटत नाही. तो आपल्या आतील साप व बेडूक मारण्यासाठी नदीत उडी मारतो. नदीच्या पैलतीरी जिनेश्वरीचे योगी असतात. ते जयघोषला बोध देतात, तुला सत्य कळले आहे तर परमात्म्याचाही बोध होऊ दे. तू स्वतः श्रेष्ठ होऊन इतरांनाही श्रेष्ठ बनवू शकतो. जयघोष संयमाच्या मार्गावर साधना सुरु करतो. एकेदिवशी त्याला आपल्यात सामर्थ्य आल्याचे जाणवते. तो पुन्हा काशीत येतो. भाऊ विजयघोषच्या अंगणात तो पारण्यासाठी पोहोचतो. पण विजयघोष त्याला ओळखत नाही. तिथे यज्ञ सुरू होता. तो जयघोषला आहार देण्यास नकार देतो. हा आहार फक्त धर्म जाणणाऱ्यांसाठी आहे, तुला मिळणार नाही. हे ऐकून जयघोष अजिबात विचलित होत नाही. तो प्रश्न विचारतो, तु धर्म , वेद, यज्ञात श्रेष्ठ काय आहे, हे जाणतो कां?. हा प्रश्न ऐकून विजयघोष कबुली देतो की मला श्रेष्ठ काय हे माहीत नाही. जो आपल्या आतील आजार कबूल करतो त्याच्यावरच उपचार होऊ शकतात. जो आजारच स्विकारत नाही त्याच्यावर उपचार होऊ शकत नाही. जयघोष सांगतो, यज्ञ महत्वाचा नसतो तर यज्ञ करणारा महत्वपूर्ण असतो. ब्राह्मण म्हणजे 'जे मिळाले ते त्यावर कब्जा करत नाही. जे चालले त्यासाठी रडत बसत नाही'. आपल्या आतील राग, द्वेष, भय ज्याने यज्ञात जाळले तो ब्राह्मण असतो. जो कोणत्याही प्रकारे हिंसा करत नाही, जो खोटं बोलत नाही, ज्याच्या मनात कसलीही वासना नाही तो ब्राह्मण आहे. केवळ मुंडण करून, वेशभूषा करून, बाह्य तपस्या करून कोणी ब्राह्मण नाही होत. ब्राह्मण जीवनशैलीमुळे होत येत, जन्माने नाही. विजयघोषच्या लक्षात येते हाच खरा योगी आहे. तो जयघोषला आहार घेण्यासाठी आग्रह करतो. तेव्हा जयघोष आपले ध्येय विशद करतो. तो म्हणतो, 'मला भिक्षेची गरज नाही. तू फक्त या संसार सागरातून, आसक्तीतून बाहेर पड. भोगी नाही तर योगी बन. सांगणारा आणि ऐकणाराही समर्थ असल्याने आमूलाग्र बदल झाला. विजयघोष संयमाचा मार्ग स्विकारतो.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

रेशन कार्ड, धान्यासाठी नागरिकांची फरफट

अन्यथा रिपब्लिकन सेनेचे पुरवठा कार्यालयाला टाळे ठोकणार


अहिल्यानगर शहरातील गोरगरीब व गरजू कुटुंबांना नवीन रेशन कार्ड तसेच रेशनिंगचे धान्य मिळण्यात येणाऱ्या अडचणींच्या निषेधार्थ रिपब्लिकन सेनेच्या वतीने शहर अन्नधान्य पुरवठा वितरण कार्यालयाला टाळे ठोको आंदोलन करण्यात आले. यावेळी कार्यालयासमोर निदर्शने करून प्रशासनाच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

नगर – अहिल्यानगर शहरातील गोरगरीब व गरजू कुटुंबांना नवीन रेशन कार्ड तसेच रेशनिंगचे धान्य मिळण्यात येणाऱ्या अडचणींच्या निषेधार्थ रिपब्लिकन सेनेच्या वतीने शहर अन्नधान्य पुरवठा वितरण कार्यालयाला टाळे ठोको आंदोलन करण्यात आले. यावेळी कार्यालयासमोर निदर्शने करून प्रशासनाच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात जिल्हा महासचिव दिलीप साळवे, जिल्हा उपाध्यक्ष बाळू वाघमारे, महिला शहराध्यक्ष मंगल बरकडे, मोना घोरपडे, संगीता साठे, आशा सावंत, वैशाली शिरसाठ, रूपाली आयची, अविद्या ठोंबरे आदींसह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

यावेळी निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर शहर अन्नधान्य पुरवठा कार्यालयात गेल्या एक ते दोन महिन्यांपासून 'सर्व्हर डाऊन आहे' असे कारण सांगून नागरिकांना वारंवार हेलपाटे मारण्यास भाग पाडले जात आहे. शहरातील गोरगरीब व गरजू नागरिक नवीन रेशन कार्ड, दुबार रेशन कार्ड तसेच नाव समाविष्ट करणे व ट्रान्सफर यांसारख्या कामांसाठी ऑनलाइन अर्ज करण्याकरिता कार्यालयात येतात. मात्र, सर्व्हर बंद असल्याचे कारण देत त्यांना कोणतेही समाधानकारक उत्तर दिले जात नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

विशेष म्हणजे, लाभार्थ्यांचे नाव कमी करण्यासाठी अवघ्या पाच ते दहा मिनिटांत प्रक्रिया पूर्ण केली जाते; मग नवीन लाभार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज झाल्यानंतरही त्यांना रेशनिंगचे धान्य मिळण्यासाठी चार ते पाच महिने का लागतात, असा सवाल शिंदे यांनी उपस्थित केला. अनेक लाभार्थी रेशन दुकानात धान्य घेण्यासाठी गेल्यानंतर दुकानदारांकडून तुमचे नाव अद्याप ऑनलाइन आलेले नाही, असे सांगितले जाते. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांना धान्यापासून वंचित राहावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

गोरगरीब नागरिकांच्या अन्नधान्याशी संबंधित प्रश्नांकडे पुरवठा विभागाने गांभीर्याने लक्ष देऊन नवीन रेशन कार्ड, नाव समाविष्ट करणे तसेच धान्य वितरणातील प्रलंबित अडचणी तातडीने दूर कराव्यात, अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने करण्यात आली आहे. प्रशासनाने या प्रश्नांची वेळीच दखल घेतली नाही, तर पुरवठा विभागाच्या विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

मुळा पाटबंधारे विभागातील कथित भ्रष्टाचाराविरोधात वंचित बहुजन आघाडीचे बेमुदत आमरण उपोषण सुरू



नगर – मुळा पाटबंधारे विभागांतर्गत कालवे व वितरिकांची झालेली दुरवस्था, विकासकामांमधील कथित आर्थिक गैरव्यवहार, नियमबाह्य कामांचे वाटप तसेच शेतकऱ्यांकडून पाणी उपसण्यासाठी प्रति मोटार दोन हजार रुपये वसूल केल्याच्या आरोपांची सखोल चौकशी करावी, या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सिंचन भवन कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू असून, प्रशासनाकडे वारंवार लेखी निवेदने व पुराव्यांसह पाठपुरावा करूनही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. या उपोषणात सुशील साळवे, मनोज साळवे, राजू अडसूळ, अशोक देवढे, देविदास भालेराव, किरण चव्हाण आदी सहभागी झाले आहेत.

निवेदनात म्हटले आहे की, सोनई, घोडेगाव व इतर शाखांच्या कार्यक्षेत्रात रोटेशन काळात प्रत्येक मोटारीमागे दोन हजार रुपये याप्रमाणे शेतकऱ्यांकडून कथितरीत्या बेकायदेशीर वसुली केली जात आहे. संबंधित उपअभियंता पदावर रुजू झाल्यापासून गेल्या पाच वर्षांपासून हा प्रकार सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच शेतकऱ्यांकडून पैसे घेऊन बंधारे भरून दिले जात असल्याचा दावाही निवेदनात करण्यात आला आहे.

पारदर्शक ई-निविदा प्रक्रियेच्या नावाखाली सिद्धिविनायक मजूर संस्था व इतर मर्जीतील संस्थांना नियमबाह्य पद्धतीने कामांचे वाटप होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. उपअभियंता संदीप पवार हे शासकीय पदाचा गैरवापर करून स्वतःच्या नावाने खासगी प्रकल्प राबवत असल्याचा आरोप करत या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन अधिनियम २००५ नुसार वर्ग एक अधिकाऱ्यांचा कार्यकाळ तीन वर्षांचा निश्चित असताना कार्यकारी अभियंता मागील आठ ते दहा वर्षांपासून एकाच पदावर कार्यरत असल्याचा मुद्दाही आंदोलकांनी उपस्थित केला आहे. राहुरी, घोडेगाव, नेवासा, कुकाणा आणि अमरापूर या पाच उपविभागांतील सन २०२४-२५ व २०२५-२६ मधील कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. माहिती अधिकारातून मिळालेल्या कागदपत्रांची कार्यालयातील मूळ टेंडर रजिस्टरशी प्रत्यक्ष समोरासमोर पडताळणी केली जात नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

जीतो अहिल्यानगर चॅप्टरतर्फे २०२६-२८ साठी पदग्रहण व शपथविधी सोहळा



नगर – जीतो अहिल्यानगर चॅप्टरतर्फे २०२६-२०२८ या नवीन कार्यकाळासाठी पदग्रहण व शपथविधी सोहळ्याचे आयोजन २९ ऑक्टोबर रोजी सॉलिटेअर बाय बडीसाजन, अहिल्यानगर येथे करण्यात आले. या सोहळ्यास ६५० हून अधिक सदस्य उपस्थित होते. या सोहळ्यास जीतोचे पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये विजय भंडारी – जीतो ॲपेक्स ॲडव्हायजरी कौन्सिल, सुजीत भटेवार – जीतो ॲपेक्स सेक्रेटरी, पेमराज बोथरा – JATF ट्रस्टी, सुश्री प्रियांका परमार – माजी संचालिका, जीतो ॲपेक्स आणि रवींद्र खिंवसरा- जीतो ॲपेक्स संचालक व ROM झोन चेअरमन यांचा समावेश होता.

विजय भंडारी व सुजीत भटेवार यांनी चॅप्टरच्या प्रगतीचे आणि विविध उपक्रमांचे कौतुक करून नवीन नेतृत्वाला शुभेच्छा दिल्या.

रवींद्र खिंवसरा यांनी मुख्य चॅप्टर, लेडीज विंग आणि युथ विंग या तिन्ही विभागांच्या नवनियुक्त व्यवस्थापन समित्यांना पदाची शपथ दिली.

सदस्य संख्येतील उल्लेखनीय वाढ : या सोहळ्यात जीतो परिवारात नव्याने सहभागी झालेल्या सदस्यांचा पिनिंग समारंभ हा विशेष आकर्षणाचा भाग ठरला. यावेळी ५ नवीन चीफ पॅट्रन्स आणि ११६ नवीन पॅट्रन्स यांचे पिनिंग करून जीतो परिवारात स्वागत करण्यात आले. तसेच लेडीज विंगमध्ये ६० हून अधिक आणि युथ विंगमध्ये ५८ हून अधिक नवीन सदस्यांची भर पडली.

जून २०१८ मध्ये अवघ्या २२ सदस्यांसह सुरू झालेल्या जीतो अहिल्यानगर चॅप्टरने केवळ आठ वर्षांत ५०० हून अधिक सदस्यांचा भक्कम परिवार उभा केला आहे. मुख्य चॅप्टर, लेडीज विंग आणि युथ विंग यांच्या माध्यमातून संस्थेने केलेली ही प्रगती सदस्यांचा विश्वास, सहभाग आणि सामूहिक प्रयत्नांचे प्रतीक आहे.

नवीन नेतृत्वाची घोषणा । कार्यकाळ २०२६-२०२८

नवीन कार्यकाळासाठी तिन्ही विभागांचे नेतृत्व पुढील प्रमाणे आहे:

– मुख्य चॅप्टर : अध्यक्ष – तुषार कर्नावट; मुख्य सचिव – प्रणिल मुनोत.

– लेडीज विंग : अध्यक्षा – सौ. सुमंगला मुनोत; मुख्य सचिव – सौ. सोनाली डुंगरवाल.

– युथ विंग: अध्यक्ष – यश भंडारी; मुख्य सचिव – निखिल गांधी.

तिन्ही विभागांच्या नवनियुक्त अध्यक्षांनी आपल्या मनोगतात संस्थेने दाखवलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि नवीन कार्यकाळात चॅप्टरच्या प्रगतीसाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

माजी अध्यक्ष अलोक मुनोत यांनी २०२४-२०२६ या दोन वर्षांच्या कार्यकाळातील आपल्या प्रवासातील अनुभव मांडले. या काळात सहकार्य करणाऱ्या व्यवस्थापन समितीतील सर्व सदस्यांचे आणि जीतो परिवाराचे त्यांनी आभार मानले तसेच नवीन नेतृत्वाला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

लेडीज विंगचा 'सेव्ह वॉटर' उपक्रम

लेडीज विंगच्या नवनियुक्त अध्यक्षा सौ. सुमंगला मुनोत यांनी नवीन कार्यकाळासाठी लेडीज विंगचा विशेष उपक्रम म्हणून 'SAVE WATER – जलसंवर्धन' याची घोषणा केली. या उपक्रमांतर्गत पाण्याची बचत, पाण्याचा योग्य वापर आणि जलसंवर्धनाबाबत जनजागृती करण्यावर भर दिला जाणार आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी जीतो अहिल्यानगर चॅप्टरचे मुख्य सचिव प्रणिल मुनोत यांनी आभार प्रदर्शन केले.

नवीन सदस्यांचा सहभाग, मार्गदर्शन आणि नवीन नेतृत्वाचा उत्साह अशा सकारात्मक वातावरणात सोहळ्याची सांगता झाली. जीतो अहिल्यानगर चॅप्टरच्या २०२६-२०२८ या नवीन कार्यकाळाची उत्साहपूर्ण सुरुवात यानिमित्ताने झाली.


देशाचे पहिले उपपंतप्रधान व भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

वृक्षारोपण अन् स्वच्छता अभियानातून पर्यावरण रक्षणाचा संदेश

नगर – देशाचे पहिले उपपंतप्रधान व भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त भिंगार येथे हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने विविध सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. वृक्षारोपण, स्वच्छता अभियान आणि एकता रॅलीतील सहभागातून ग्रुपच्या सदस्यांनी राष्ट्रीय एकात्मतेसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. वाढते तापमान, पाणीटंचाई आणि दुष्काळाचे संकट लक्षात घेता प्रत्येक नागरिकाने वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन करावे, पाण्याचा काटकसरीने वापर करावा आणि परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

यानंतर लॉरेन्स स्वामी व भिंगार छावणी परिषदेचे वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक गणेश भोर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच परिसरात स्वच्छता अभियान राबवून सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ व सुंदर ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी एकता रॅलीत सहभागी होत राष्ट्रीय एकात्मता, झाडे लावा, पर्यावरण वाचवा आणि पाणी बचतीचा संदेश दिला.

यासाठी ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, जहीर सय्यद, ताराचंद टोकळ, सर्वेश सपकाळ, अशोक पराते, दिलीप ठोकळ, योगेश चौधरी, सुंदरराव पाटील, सखाराम अळकुटे, निजाम पठाण, अभिजीत सपकाळ, विकास भिंगारदिवे, संतोष लुनिया, छावणी परिषदेचे मनोनित सदस्य वसंत राठोड, कार्यालयीन अधीक्षक सुनील शिंदे, मुख्याध्यापक संजय शिंदे, राजेंद्र भोसले, भारुड सर, दिलीपराव पालवे, रतन मेहेत्रे, जोगिंदरसिंग, उमाशंकरसिंग पंडित, सरदारसिंग परदेशी, अविनाश पोतदार, शेषराव पालवे, सुभाष पेंढुरकर, दीपक घोडके, रामनाथ गर्जे, देविदास गंडाळ, कांता वाघुळे, वामन पगारे, महादेव साबळे, बाळासाहेब सूर्यवंशी, विशाल भामरे, बाळासाहेब झिंजे आदी उपस्थित होते.

जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर ठरलेला असुन त्यापोटी आमच्या अशिलाकडून विद्यमान मालकाने विसाराची खुप मोठी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत विद्यमान मालकाच्या मालकीची व वहिवाटीची असुन सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जमी, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता.०२/११/२०२६.

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, जिल्हा परिषद हद्दीतील, **मौजे निंबळक** येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत-

गट नंबर ४८७/अ चे क्षेत्र ७हे.९५आर + पो.ख.०हे.३५आर असे एकुण क्षेत्र ८हे.३०आर याचा आकार २६ रु.३७पैसे यापैकी क्षेत्र ०हे.४०आर ही संपुर्ण शेतजमिन.

यांसी चतुःसिमा –

पुर्वेस :- गट नंबर ४८७/अ पैकी अशोक जगन्नाथ कोतकर व
मंदाबाई बाळु कोतकर यांची मिळकत
दक्षिणेस :- गट नंबर ४८७/अ पैकी प्रदीप पिराजी कोतकर व
मंगल प्रदीप कोतकर यांची मिळकत
पश्चिमेस :- निमगांव वाघा रस्ता
उत्तरेस :- गट नंबर ४८७/अ पैकी रोहीणी बाळासाहेब कोतकर व
उध्दव रावसाहेब अमृते यांची मिळकत

वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक – प्रिया गिरिष भुंजे रा. पुणे.

ॲड. समीर वखारे

पत्ता :- ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहिल्यानगर. मो. नं. ९०१६७८९९९. ९८६०८०५५५९

नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.,अहमदनगर
(मल्टीस्टेट शेड्यूल्ड बँक) (अवसायनांतर्गत) बँक रोड,पोस्ट बॉक्स नंबर-७, अहिल्यानगर-४१४००१ Ph-0241-2343641 / 42

पुन:श्च जाहीर सूचना

याव्दारे सर्वांना सुचित करणेत येते की, नगर अर्बन को-ऑप. बँक लि., या बँकेने यापुर्वी दिनांक ०४/०५/२०२६ रोजी दैनिक प्रभात व समाचार व दिनांक १५/०७/२०२६ रोजी दैनिक प्रभात या वृत्तपत्रात सन २००७ पुर्वीचे कालबाह्य रेकॉर्ड नष्ट करणेसाठी जाहीर सुचना प्रसिद्ध करणेत येवून प्रसिद्ध दिनांकापासून ३० दिवसांचे आत रेकॉर्ड मागणी व हरकती मागविण्यात आले होत्या. त्यानुसार कोणत्याही प्रकारचा रेकॉर्ड मागणी करीता अर्ज अथवा हरकत प्राप्त न झाल्याने नगर अर्बन को-ऑप. बँक लि., अवसायनात गेल्यामुळे सन २००७ पुर्वीचे जुने रेकॉर्ड नष्ट करायचे आहेत. रेकॉर्ड नष्ट करणेचे प्रक्रिया लवकर सुरु करणेत येणार आहे. जुने रेकॉर्ड नष्ट करण्यासाठी Banking Com{anies (Period of Preservation of Records) Rules, 1985 मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात येणार आहे.

सदरील रेकॉर्ड नष्ट करणेबाबत कोणत्याही व्यक्ती संस्था, फर्म, शासकीय-निमशासकीय कार्यालय, ठेवीदार, खातेदार, सभासद, ग्राहक अथवा एखादा प्राधीकरणास या रेकॉर्डची प्रत पाहिजे असल्यास अथवा रेकॉर्ड नष्ट करणेबाबत कोणाची हरकत असल्यास पुनश्च जाहीर सुचना प्रसिद्ध दिनांकापासून १५ दिवसांच्या कालावधीत सादर करावी. जर दिलेल्या १५ दिवसांच्या कालावधीत कोणतेही अर्ज अथवा हरकत प्राप्त न झाल्यास सदरील कालबाह्य रेकॉर्ड नष्ट करणेची प्रक्रिया सुरु करणेत येईल. मुदतीनंतर प्राप्त झालेला अर्ज, हरकत तसेच कोणत्याही पत्रव्यहाराची दखल घेतली जाणार नाही.

(अवसायक)
नगर अर्बन को. ऑप.बँक लि.,अहमदनगर
(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)
केंद्रशासनाधिन अवसायानाअंतर्गत, अहिल्यानगर

तारीख : ०१/११/२०२६
ठिकाण – अहिल्यानगर

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

त्वरीत जागा भरणे आहे

१)आर. एम. ओ.	– २ (सिनिअर Rmo)
२)फार्मसिस्ट–	– ३ जागा
३)फिजिओथेरपिस्ट	– १ जागा
४)नाईट सुपरवायझर	– १ जागा
५)ओटी. असिस्टंट.	– २ जागा
६)पी आर ओ.	– १ जागा

उमेदवारांनी आपल्या बायोडाटा सह प्रत्यक्ष भेटावे.
मंगळवार दिनांक. ०३/११/२०२६ सायंकाळी ५.३०.
(अनुभवी असल्यास प्राधान्य)

न्यूरॉन प्लस हॉस्पीटल, सावेडी, अहिल्यानगर.
8459698717 / 7378318772

Shankarleela INFRASTRUCTURES PVT. LTD.

पाहिजेत

आम्ही खालील पदासाठी कुशल व अनुभवी उमेदवारांच्या शोधात आहोत

सीनियर अकाउंटंट - पदे 2 | ज्युनिअर अकाउंटंट - पदे 2
साईट सुपरवायझर - पदे 4
साईट इंजिनिअर (बी.ई. सिव्हिल) - पदे २
ऑफिस बॉय – पदे २

आत्ताच अर्ज करा!

ऑफिसचा पत्ता : ३०१, ए.पी.स्क्वेअर, प्रोफेसर चौक, सावेडी, अ.नगर
संपर्क : 7063638080 | 7037374949

Jain Social Federation's

ANANDRISHIJI HOSPITAL & HEART SURGERY CENTER

124, Anandrishiji Marg, Ahmednagar. Tel. : 0241 - 2320473, 74, 75 , M. 86684 22387
E-mail : anandrishiji@rediffmail.com. * Website : www.anandrishijihospital.com

Be a part of Super speciality healthcare facilities, 260 bed Multi super speciality Trust hospital with 72 beded ICU invites application for following Full time consultant posts.

REQUIRED

- **BTO for Blood Bank** 01
  Qualification : MD (Path) / DCP / MBBS
- **Physiotherapist** 02
  Qualification : Master / Bachelor/ Diploma in Physiotherapy . Experience - 2-3 years
- **HR Manager** 02
  Qualification : MBA (HR) / MPM Experience - 5-10 years.
- **ICU RMO for Night Duty** 05
  Qualification : MBBS / BAMS / BHMS
- **Cashless Clerk** 02
  Qualification : B.Com. / BCA / B.A.

Attractive Payment according to experience
apply with full biodata or send application on
E-mail : arh.personnel@gmail.com
Administrative Officer

त्वरित पाहिजे

दुकानात कामासाठी कॉम्प्युटर व टॅलीचे पूर्ण अनुभव असलेला
मुलगा त्वरित पाहिजे
(पुर्णवेळ स. १०.३० ते रा. १०.३०)
8669912372

पाहिजेत

१. फिल्ड सेल्स एक्झिक्युटिव्ह
२.डिप्लोमा इलेक्टॉनिक्स
३.ड्रायव्हर/ऑफीस बॉय
माळीवाडा, अहिल्यानगर
9226113015

पाहिजेत सिक्युरिटी गार्ड

सुखदा हास्पिटल
बालिकाश्रम रोड, अहिल्यानगर

टेलिकॉलिंगसाठी मुली पाहिजेत

(शिक्षण-ग्रॅज्युएट किंवा ॲपीयर चालेल)
(सिटीमधील/अनुभवी असेल तर प्राधान्य)
(कायमस्वरूपी कामासाठी देखार असलेल्यांना प्राधान्य)
फक्त गरजु मुलींनीच संपर्क करावे.
Angel One
HDFC बँकेच्या वर, चितळे रोड, अहिल्यानगर
9270720410

SBI LIFE INSURANCE मध्ये २५ जागांसाठी भरती!

नोकरीच्या शोधात आहात?तर ही संधी तुमच्यासाठी आहे!
Insurance Advisor / Life Mitra (एकूण रिक्त जागा: २५)
(काम: Full Time / Part Time)
आकर्षक उत्पन्नाची संधी, प्रशिक्षण व मार्गदर्शन
करिअरमध्ये प्रगती करण्याची उत्तम संधी!
SBI Life Insurance Co. Ltd.
Gaurav Vairagar
Development Manager SBI Life Insurance Co. Ltd.
संपर्क: 9730356450
आजच संपर्क साधा आणि आपल्या उज्वल भविष्याची सुरुवात करा!
टीप: भरतीची पात्रता, पदे व अटी कंपनीच्या नियमानुसार लागू राहतील

---

3 BHK रो-बंगलो भाड्याने देणे

प्रशस्त पार्किंग, सर्व सुविधांयुक्त धर्माधिकारी मळा, सावेडी,अहिल्यानगर येथे
संपर्क : 9881538977

फ्लॅट भाड्याने देणे

1BHK & 2BHK, दुसऱ्या मजल्यावरचे फर्निचरसह स्वतंत्र फ्लॅट भाड्याने देणे.
छाया टॉकीज जवळ, तोफखाना, अहिल्यानगर.
-: संपर्क :-
9423464158

विकणे आहे

रो-बंगलो विकणे
गणेशनगर, कल्याणरोड येथे ७०० स्क्वे. फुट १३०० बांधकाम असलेले
9834407676

प्लॉट विकणे

रो-बंगलो स्कीमसाठी उपयुक्त रेसिडेन्शयल प्लॉट उपलब्ध
L ब्लॉक पारस कंपनी मागील
9607519536
7745072121

भाड्याणे देणे आहे

बालिका अश्रमरोड महालक्ष्मी उद्यान समोर असलेले १२ X १५ फुटाचे २ गाळे किंव्हा दोन्ही मिळुन एकच गाळा ,डॉ. क्लिनीक, बँक,पतसंस्था, ऑफिस, गोडाऊन,कॅफे, हॉटेल इ.साठी भाड्याणे देणे आहे
संपर्क
9975672401

भाड्याने देणे

पाईपलाईन रोड, श्रीराम चौक लगत
1BHK फ्लॅट भाड्याने देणे
9075042457

भाड्याने मिळेल

नवीन गोडाऊन भाड्याने मिळेल
भोसले लॉन कमान जवळ, अ. नगर
7620089420

भाड्याने देणे

डॉक्टर कॉलनी येथे छोट्या कुटुंबासाठी
1BHK बंगला भाड्याने देणे आहे
9422222238

घर विकणे

1RK घर विकणे आहे
प्लॉट एरिया ६२१ स्क्वे. फुट, बिल्ड अप ३८० स्क्वे. फुट
पत्ता- गणेश नगर, शंकर महाराज मठाजवळ, नगर-कल्याण रोड
8329252794
9527566833

ऑफिससाठी जागा भाड्याने देणे

700 स्क्वे. फुट
श्रीराम चौक, पाईपलाईन रोड
400 स्क्वे. फुट
आडतेबाजार
9422220342

अस्सल शुध्द तुपातील मिठाईयाँ.. नमकीन..
दिवाळी फराळ
The Annapurna Foods & Events
दि अन्नपुर्णा फुडस् ॲण्ड इव्हेन्टस्
शुभ दीपावली
शहरात सुध्दा उपलब्ध –
अमृत किराणा शेजारी, घुमरे गल्ली, अ.नगर
साईनगर, ज्येष्ठ नागरिक भवन समोर, विनायकनगर रोड, अ.नगर.
M. 878899 3545
989090 4818

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दिनांक : 23 ते 29 ऑक्टोबर 2026
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

SCREEN - 1

दशमी 03:00 PM 150/-
गांव थी गावकी.. 12:00 Noon 150/-
प्रहार (हिंदी) 09:00 PM 150/-
सोहळा 06:00 PM 150/-

SCREEN - 2

रजनी : द जेलर २ (हिंदी) 12:00 Noon 150/- 09:00 150/-
'दृश्यम 3' 03:00 150/-
कमसुकांडम (मराठी) 06:00 PM 150/-

आशा कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
स्क्वेअर
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 30 ते 05 नोव्हेंबर 2026

रजनी : द जेलर २ (हिंदी) 09:00 AM 03:45 PM 12:30 PM 06:00 PM 02:45 PM 07:00 PM 09:15 PM 10:15 PM
उडता तीर (हिंदी) 09:00 AM 01:45 PM 11:00 AM 04:30 PM 10:00 PM
प्रहार (हिंदी) 10 :00 AM 03:45 PM 09:45 PM
दृश्यम ३ 11:45 PM
आदर्श कुटुंब हलाल नं.४७ (तेलुगू) 06:45 AM
हनुमान अंश (हिंदी) 12:45 PM

Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher* - Offer Valid On Window Booking & Phone Booking
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

MY cinema

अॅडव्हान्स बुकिंग सुरू
AHILYANAGAR'S 1ST 5-SCREEN MULTIPLEX
Pipeline Road, Ahilyanagar. Onling Booking - BookMyShow



Show - 2/11/2026 to 4/11/2026
DRISHYAM : THE CONCLUSION - 12:15, 4:25, 7:20 pm,
PEHLA PYAAR DOOSRI.. - 2:30, 10:00 pm.
PRAHAAR (Hindi) - 7:00 pm
RAJINI: The Jailer- 11:00 am, 3:00, 6:00, 9:00 pm,
UDTA TEER- 12:00, 2:00, 5:00, 9:30 pm.
Booking No. : 9325085347 | टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात.

15TH AUG HAPPY INDEPENDENCE DAY OFFER

Career Ki Shurwat DISHA ke saath
An ISO 9001:2015 Certified
DISHA COMPUTER INSTITUTE

Get Any Course Just in 2700/-

MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME, ADV. TALLY, BANKING, TAXATION, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++, CANVA, HTML.

दिल्ली गेट शाखा
आनंद केशव हाइट्स, सुपेकर मेडिकलच्या वरती, पहिला मजला, दिल्ली गेट, अ.नगर.
9371051769

जुने बस स्टँड शाखा
अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा बस स्टँड शेजारी. अ.नगर.
9371151769

पाईपलाईन शाखा
रुचा गार्डन बिल्डिंग, भिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड अहमदनगर
7447761769

दिवाळी महासेल.. स्टॉक असेपर्यंत...

महिलांसाठी : साडी, कुर्ती, लेगीन्स, वन पीस,ब्लाऊज भारी, टॉप, लोवर — रु.२००/-ला काहीही १ व रु.५०० ला ३
लेडीज : स्मॉल ते X L टू पीस, कॉर्ड सेट, नाईट ड्रेस — रु.२५०/-
टू पीस 3 X L ते 6 x L — रु.३००/-

* लहान मुला-मुलींचे ड्रेस रु. २०० पासून पुढे
* लहान व मोठ्या मुलींचे भारी कपडे रु.३०० पासून पुढे
* बेडशीट+पिलो कव्हर
  100 x 100 चे ८०० चे रु.४००/-
  108 x 108 चे रु.१२०० चे रु.५००/-
  वेळ : दुपारी १२ रात्री ८ वाजेपर्यंत
* ब्रॅण्डेड लेडीज २ पीस थ्री पीस रु.१००० पासून पुढे
* जेन्टसचे ब्रॅण्डेड शर्ट, टी-शर्ट 6XL पर्यंत तसेच फॉर्मल पॅण्ट व जीन्स ४४ साईजपर्यंत व जम्बो बेडशीट उपलब्ध.

अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल — मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

भावपूर्ण श्रद्धांजली



स्व. भानुदासजी कोतकर
(स्व. दि. २४/१०/२०२६)
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली
दुःखांकित
रत्नाकर पांडुरंग शिरसाठ, अनिल पांडुरंग शिरसाठ
विजय पांडुरंग शिरसाठ, राजेंद्र पांडुरंग शिरसाठ
राहुल रत्नाकर शिरसाठ, नितीन अनिल शिरसाठ
अक्षय विजय शिरसाठ, तेजस राजेंद्र शिरसाठ
शिरसाठ परिवार, बोल्हेगांव, नागापूर

महाराष्ट्रातील सर्वात खस्त कापड मॉल महावीर मॉल

स्वस्त म्हणजे नक्की काय असतें..?



लहान मुलांचे 1 वर्ष ते 16 वर्षा पर्यंतचे इंडो वेस्टर्ण ड्रेस, शेरवानी, जॅकेट सूट, ब्लेझर, इंपोर्टेड कार्गो पॅन्ट, अरमानी पॅन्ट, इंपोर्टेड शर्ट, कार्गो शर्ट, इंपोर्टेड टी.शर्ट अशी फॅन्सी आणि ब्रँडेड फेस्टिवल रेंज जी कुठेही पहायला मिळणार नाही आणि तेही सर्व चॅलेंज रेट मध्ये. ₹ 299 /- पासून ते ₹ 1999/- रु. पर्यंत ची भव्य रेंज.

मार्केट पेक्षा वेगळं पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.

अधिक माहितीसाठी भेट द्या.
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर

अहिल्यानगर महानगरपालिका
नगरसचिव विभाग जा. क्र. ३४२
दिनांक : ३०/१०/२०२६

अहिल्यानगर महानगरपालिका सर्वसाधरण सभेची सुचना

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ अन्वये)
सभा सुचना क्रमांक ०३, पुरवणी विषय बुधवार दिनांक ०४/११/२०२६

प्रति,
सन्मा. श्री. /श्रीमती.....
सदस्य.
अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर.
यांस-

महोदय,
कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ (क) अन्वये मा. महापौर यांनी अहिल्यानगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा क्र.०३ बुधवार दिनांक ०४/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड येथील महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ सभागृहात सोबतच्या पुरवणी विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी सर्वसाधारण सभा आयोजित केली आहे.
आपणांस सप्रेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यांत येत आहे.
सोबत:- १. पुरवणी विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी.

नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर
नगरसचिव विभाग
सभा क्र.०३ दिनांक : ३०/१०/२०२६

अहिल्यानगर महानगरपालिका सभा क्रमांक : – ०३ दिनांक : ०४/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजताच्या पुरवणी विषयपत्रिका (राजमाता जिजाऊ सभागृह) छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर येथे होणाऱ्या सर्वसाधारण सभेची पुरवणी विषयपत्रिका.

वि. क्र.	पुरवणी विषय
४९	अहिल्यानगर महानगरपालिका विद्युत विभाग कंत्राटदार विभाग यांचेकडे कामकाज करणारे कै. धिरज परदेशी यांचे कुटुंबाला आर्थिक मदत करणे बाबत.

मा. महापौर यांच्या आज्ञेने.
नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका
प्रसिद्धी जाहक क्रमांक. ५३९. दि. ०२/११/२०२६

